रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १६६
www.ramprahar.com
बुधवार, १ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


मुरुड : सायंकाळी मंद प्रकाशात जल्लोष करीत पर्यटकांनी सरत्या वर्षाला निरोप दिला. (छाया : सुधीर नाझरे)

# वाल्मिक कराड अखेर शरण!
## पुण्यातील सीआयडी कार्यालयात आत्मसमर्पण

**पुणे, बीड : प्रतिनिधी**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सूत्रधार असल्याचा आरोप केलेला वाल्मिक कराड मंगळवारी (दि. ३१) पुण्यात सीआयडी अर्थात राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे शरण आला. अवदा कंपनीतील कर्मचाऱ्यास दोन कोटी रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी कराडला पोलिसांनी अटक करून केज येथे आणले आहे.

वाल्मिक कराड तीन आठवड्यांपासून फरार होता. आता या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींची संख्या चार झाली आहे, तर दोन आरोपी फरार आहेत. दरम्यान,



शरण येताना हत्येच्या प्रकरणाशी काही संबंध नाही. मारेकऱ्यास शिक्षा व्हावी, अशी भूमिका असल्याचे कराड याने समाजमाध्यमांमध्ये जाहीर केले.

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण झाले व त्यानंतर त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या हत्येचे पडसाद राज्यभरात उमटले. नुकत्याच पार पडलेल्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनातही हा मुद्दा गाजला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात आल्याचे सांगितले होते. त्याचबरोबर या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे म्हटले होते.

दरम्यानच्या काळात वाल्मिक कराड याची पत्नी आणि त्यांच्या संपर्कातील काही जणांची सीआयडीकडून चौकशी करण्यात आली, तर काही आरोपींची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

### गुंडांचे राज्य चालू देणार नाही –मुख्यमंत्री

**मुंबई** : वाल्मिक कराड यांच्या आत्मसमर्पणानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. गुंडांचे राज्य आम्ही चालू देणार नाही. कुणालाही अशा प्रकारे हिंसा करता येणार नाही, खंडणी मागता येणार नाही. त्या अनुषंगाने आम्ही तपासाला गती दिली असून त्यामुळेच वाल्मिक कराड यांना शरणागती पत्करावी लागली. आता हत्येतील फरार आरोपींना पकडण्यासाठी वेगवेगळी पथके कामाला लागली आहेत. कुठलाही आरोपी आम्ही सोडणार नाही. सर्वांना शोधून काढले जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

जाणीवपूर्वक ही केस सीआयडीकडे देण्यात आली असून त्यांना पूर्ण स्वायत्ता देण्यात आली आहे. कुणाचाही दबाव त्यांच्यावर राहणार नाही तसेच कोणताही दबाव चालून घेतला जाणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

# पनवेल येथे वैद्यकीय सहाय्यता कक्ष

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते व मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत आज लोकार्पण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध वैद्यकीय योजना तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचा मदत निधी पनवेल व उरण तालुक्यातील आदिवासी, गरीब, गरजू नागरिकांपर्यंत पोहचवून त्यांच्या निरोगी आणि दीर्घायु जीवनासाठी भारतीय जनता पक्ष पनवेल आणि उरण विधानसभा मतदारसंघाच्या वतीने पनवेल भाजप कार्यालय येथे वैद्यकीय सहाय्यता कक्ष उभारण्यात आला आहे.

या मध्यवर्ती कार्यालयाचा लोकार्पण सोहळा बुधवारी (दि. १ जानेवारी) सकाळी १०.३० वाजता माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

पनवेल आणि उरण विधानसभा क्षेत्रातल्या प्रत्येक नागरिकांसाठी हे कार्यालय वैद्यकीय सहाय्य करण्याच्या दृष्टिकोनातून सदैव काम करणार आहे. या कार्यालयाच्या उद्घाटन सोहळ्याला पदाधिकारी व नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी जिल्हाध्यक्ष, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, खालापूर तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे यांनी केले आहे.


पनवेल : इंटरनॅशनल आईस स्विमिंग असोसिएशनच्या वतीने इटलीमध्ये १३ ते २० जानेवारीदरम्यान सहाव्या वर्ल्ड चॅम्पियनशीप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत उरणमधील जलतरणपटू प्रभात कोळी हा भारताचे प्रतिनिधीत्व करणार आहे. या पार्श्वभूमीवर त्याने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची मंगळवारी भेट घेऊन आशीर्वाद घेतले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रभातला स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या तसेच २० हजार रुपयांची आर्थिक मदत केली. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वसंतशेठ पाटील, प्रभातचे वडील राजू कोळी उपस्थित होते.

## प्राजक्ता माळीकडून प्रकरणावर पडदा

**मुंबई : प्रतिनिधी**

आमदार सुरेश धस यांनी दिलगिरी व्यक्त केल्यावर अभिनेत्री प्राजक्ता माळीने व्हिडीओ शेअर करत या संपूर्ण प्रकरणावर माझ्याकडूनही मी पडदा टाकतेय, असे सांगत सर्वांचे आभार मानले.

प्राजक्ता म्हणाली, आमदारसाहेबांनी माफी मागितल्यामुळे मी त्यांच्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई करणार नाही. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मी मनापासून आभार मानते. त्यांनी यात जातीने लक्ष घातले. अत्यंत निगुतीने व संवेदनशीलतेने त्यांनी हा विषय पुढे नेला, मार्गी लावला. त्याचबरोबर महिला आयोग व त्याच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांचेदेखील आभार!


पनवेल : महापालिकेच्या वतीने नवीन पनवेलमधील शिवा कॉम्प्लेक्स येथील गणेश मार्केटजवळील भूखंडावर तात्पुरत्या स्वरूपात मासळी विक्रेत्यांसाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. हा भूखंड मच्छी मार्केटसाठी राखीव असून तेथे मच्छी मार्केट उभारण्यात येणार आहे. तोपर्यंत मासळी विक्रेत्यांना व्यवसाय करता यावा यासाठी या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात पत्र्याची शेड उभारण्यात आली आहे. माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मंगळवारी अधिकाऱ्यांसह त्याची पाहणी करून सूचना दिल्या. या वेळी माजी नगरसेवक संतोष शेट्टी, माजी नगरसेविका सुशीला घरत, राजश्री वावेकर, महापालिकेचे शहर अभियंता संजय कटेकर आदी उपस्थित होते.

## रायगडात लोकसहभागातून वनराई बंधाऱ्यांची निर्मिती

■ कृषी विभागाने साकारले ३२३ बंधारे

**अलिबाग : प्रतिनिधी**


रायगड जिल्ह्यात कृषी विभागाने लोकसहभागातून ३२३ बंधाऱ्यांचे काम पूर्ण केले आहे. यातून शेतीलाही पाणी मिळणार आहे.

पावसाचा जोर कमी झाल्यानंतरही नाले व ओढ्यामधून पाण्याचा प्रवाह चालू असतो. अशा ठिकाणी पाण्याचा प्रवाह पारंपरिक पद्धतीने अडवून जलसाठा करण्यात येतो. बिगर पावसाळी हंगामामातील शेतीसाठी हे पाणी उपलब्ध करून दिले जाते.

वनराई बंधाऱ्याने शेतकऱ्यांना फळझाडे व भाजीपाला पिकवण्यासाठी रब्बी हंगामात पाण्याची सोय होते. शिवाय पशूपक्ष्यांनाही पिण्यासाठी पाणी मिळते. दरवर्षी कृषी विभाग वनराई बंधारे बांधण्यात पुढाकार घेते. यंदा रायगडात २०८० बंधारे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवले होते, तर ७७८ चिन्हांकित केले होते. त्यापैकी ३२३ बंधारे बांधून पूर्ण झाले. कर्जत तालुक्यात सर्वाधिक १३० बंधारे बांधण्यात आले, तर म्हसळ्यात एकही बंधारा बांधण्यात आलेला नाही.

**बांधून पूर्ण झालेले तालुकानिहाय बंधारे**

अलिबाग १५, पेण २४, मुरूड २४, खालापूर १०, कर्जत १३०, पनवेल १३, उरण २१, माणगाव ६, तळा १०, रोहा ७, सुधागड १८, महाड २३, पोलादपूर २०, श्रीवर्धन २, एकूण ३२३.




'रामप्रहर'मध्ये आजपासून

**व्यंगचित्राची धम्माल!**

**बघता बघता २०२४ वर्ष सरले अन् नवे २०२५ हे वर्ष सुरूदेखील झाले. धावपळीच्या या जमान्यात वृत्तपत्रीय वाचनामध्ये काही तरी हलकंफुलकंही असावं म्हणून नव्या वर्षापासून दै. रामप्रहरमध्ये नियमितपणे व्यंगचित्र सुरू करीत आहोत. प्रसिद्ध व्यंगचित्रकार संजय मेस्त्री व्यंगचित्र साकारणार आहेत. ते पान क्रमांक ४वर प्रसिद्ध केले जाईल. तुम्ही या नव्या सदराचेही स्वागत कराल, अशी अपेक्षा.**

**सर्वांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!**







# नववर्षात पनवेल-कर्जत लोकल धावणार

## मुंबई उपनगरीय रेल्वेसेवेत नवा कॉरिडॉर समाविष्ट होणार

**नेरळ : दर्वेश पालकर**

मुंबई लोकल ही मुंबईकरांची लाईफ लाईन म्हणून ओळखली जात आहे. नव्या वर्षात २०२५मध्ये मुंबई उपनगरीय रेल्वे सेवेत पनवेल-कर्जत हा नवा कॉरिडॉर सहभागी होणार आहे. पनवेल कर्जत या नव्या कॉरिडॉरचे काम वेगाने सुरू आहे. या नव्या रेल्वे मार्गावर मुंबई महानगरातील सर्वाधिक लांबीचा बोगदा उभारला जात आहे. तर पनवेल कर्जत लोकल याच बोगद्यातून धावणार आहे.



पनवेल आणि कर्जत दोन रेल्वे स्थानक ही छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या रेल्वे स्थानकावरून दोन दिशेला असलेली शेवटची रेल्वे स्थानक आहेत. पनवेल हे मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गावरील शेवटचे रेल्वे स्थानक आहे. तर कर्जत हे मध्य रेल्वेमार्गावरील उपनगरीय रेल्वेचे शेवटचे स्थानक आहे. यामुळे पनवेलहून कर्जतला जायचे असेल तर ट्रान्स हार्बर मार्गाने ठाणे स्टेशनला येवून पुन्हा मध्य रेल्वेवरील लोकल पकडावी लागत असल्याने आता नवीन कॉरिडोरमुळे पनवेल आणि कर्जतच्या मध्ये थेट रेल्वे कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रकल्पा अंतर्गत पनवेल कर्जत उपनगरीय रेल्वे कॉरिडोर उभारला जात आहे. जवळपास हा रेल्वे प्रकल्प २,७८२ कोटींचा नव्या रेल्वे मार्गाचा मेगा प्रोजेक्ट आहे.

पनवेल कर्जत रेल्वे मार्गाचे खास वैशिष्ट्य म्हणजे मुंबई महानगरातील सर्वाधिक लांबीचा बोगदा या प्रकल्पाअंतर्गत तयार केला जात आहे. तर २९.६ किमी लांबीच्या या नव्या रेल्वे मार्गावर तीन बोगदे तयार करणार असून, तिन्ही बोगद्यांचे खोदकामास सुरुवात झाली आहे. तर मध्य रेल्वेच्या ठाणे-दिवा स्थानकादरम्यान सध्या १.६ किमी पारसिक बोगदा हा सर्वात मोठा बोगदा आहे. व भारतीय रेल्वेवरील एक किमीपेक्षा जास्त लांबीचा हा पहिला बोगदा आहे, मात्र पनवेल - कर्जतदरम्यानच्या वावर्ले येथील २.६ किमी लांबीचा बोगदा उभारला जात आहे. वावर्ले येथील बोगदा हा मुंबई महानगरातील सर्वाधिक लांबीचा बोगदा ठरणार आहे. कर्जत-पनवेलदरम्यान सध्याचा सुरू असलेला ट्रॅक हा माल व काही मेल एक्स्प्रेस ट्रेनसाठी वापरला जात आहे, मात्र नवीन दुहेरी मार्गिकेमुळे मुंबई ते कर्जत दरम्यान उपनगरीय लोकल रेल्वे पनवेलमार्गे धावणार आहेत. हा मार्ग तयार झाल्यास सीएसएमटी-कर्जत मार्गे पनवेल हा रेल्वेचा नवा पर्याय उपलब्ध होईल.

रेल्वे सुत्रा मार्फत मिळत असलेल्या माहितीनुसार सदर रेल्वे प्रकल्प हा पूर्ण डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सध्या बोगद्यांमध्ये गिट्टीविरहित ट्रॅक टाकण्याचे काम सुरू झाले आहे. सार्वजनिक निवारा क्षेत्र तसेच बोगदा नियंत्रण यंत्रणा, प्रकाश व्यवस्था, अग्निशमन यंत्रणा, वायुवीजन यंत्रणा आदींचे काम सुरू आहे. या प्रकल्पात पनवेल, मोहोपे, चिकले चौक व कर्जत अशी एकूण चार रेल्वे स्थानक आसणार आहे. हा नवीन कॉरिडोर पूर्ण झाल्या नंतर पनवेल व कर्जतच्या मध्ये थेट रेल्वे स्थानकामध्ये केनक्टिव्हिटी मिळणार आसल्याने, कर्जत तालुक्यातील नागरिकांना कामा निमित्त पनवेल, नवी मुंबई वाशी सारख्या शहरांमध्ये जाण्याचा प्रवास हा सुखरूप व लवकरचा होणार व कर्जत तालुक्याकडे तिसरी मुंबई म्हणून पाहीले जाणार आहे. तसेच सध्या सुरू असलेले गृहप्रकपांची सुरू असलेली कामे पाहाता कर्जत तालुक्यात या पुढे मोठ मोठे गृहप्रकल्पांची वाटचाल सुरू होणार आहे.

व्यवसाय वृध्दीच्या दृष्टिकोनातून पाहिले तर कर्जत शहरासह असलेले नेरळ, कडाव, कशेळा या सह असलेल्या बाजार पेठेत बाहेरून मोठ मोठे मॉल व हॉटेल व्यावसायीक प्रस्थापित झाल्यास या बाजार पेठेने शहराती मोठ्या बाजारपेठेचे स्वरूप प्राप्त होऊन, कर्जत तालुक्यातील असलेल्या बेरोजगार तरुणांच्या हाताला काम धंदा ही मिळणार असल्याचे नाकारता येत नसुन, कर्जत तालुक्याची आर्थिक स्थिती वधरण्यासाठी पनवेल व कर्जत हा नवीन कॉरिडोर महत्त्वाचा ठरणार असल्याचे ही बोलले जात आहे.

### खर्च आणि अंतर

मुंबईवरून पनवेलमार्गे लोकल ट्रेनने कर्जतला पोहचण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या रेल्वे मार्गाचे काम सध्या वेगाने सुरू आहे. या रेल्वेमार्गावरील सर्वात आव्हानात्मक आणि महत्त्वाचा टप्पा असणाऱ्या बोगद्यांची कामे सध्या वेगात पूर्ण करण्यात येत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार या कॉरिडॉरचे ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. पनवेल ते कर्जतदरम्यान २९.६ किमी लांबीचा हा रेल्वेमार्ग असून, त्यामुळे येणाऱ्या काळात लोकांचा प्रवास सुखकर होणार आहे. यासाठी २,७८२ कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत. या कॉरिडॉरचे काम मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प ३ अंतर्गत मुंबई रेल्वे विकास महामंडळमार्फत केले जात आहे.

### उपनगरीय लोकल रेल्वे

कर्जत-पनवेल दरम्यान बांधण्यात येत असलेल्या या रेल्वे मार्गात एकूण तीन बोगदे आहेत. हे बोगदे खोदण्यासाठी न्यू ऑस्ट्रेलियन टनेलिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. यापैकी दोन किमी लांबीचा वेव्हरली बोगदा पूर्ण झाला आहे. या बोगद्याची खास गोष्ट म्हणजे संपूर्ण मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील हा सर्वात लांब बोगदा आहे. कर्जत-पनवेल दरम्यानचा सध्याचा ट्रॅक माल आणि काही मेल एक्स्प्रेस गाड्यांसाठी वापरला जातो, मात्र नवीन दुहेरी मार्गिकेमुळे मुंबई ते कर्जतदरम्यान उपनगरीय लोकल रेल्वे गाड्या पनवेलमार्गे धावणार आहे.

# साळाव जेएसडब्ल्यू वसाहतीत चोऱ्या

## एकाच दिवशी पाच ठिकाणी घरफोडी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील साळाव येथील जेएसडब्लू कंपनी कामगारासाठी वसलेल्या वसाहतीत गेले वर्षभर घरफोडी चोरींचा साखळी प्रकार घडून येत आहे. या ठिकाणी अज्ञात चोरटयांनी एकाच दिवशी पाच घरे फोडून त्यामधील रोख रक्कम व सोन्याची दागिने असा ऐवज लंपास केल्याने चोरट्यांनी मारलेल्या डल्लाने रायगड पोलिसा समोर नवे आव्हान उभे केले आहे. तर पंचक्रोशीत भितीचे सावट अज्ञात चोरट्यांनी निर्माण केले आहे.




याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे रेसिडिशियल कॉलनी बिर्ला येथील डी-५ मधील रूम नंबर ६४ चे रहिवाशी त्रेपन्न वर्षीय राजेंद्र वासुदेव रोटकर यांनी नोंदविलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, ते रहात असलेला खोलीचा लॅच लॉक तोंडून खोली मध्ये प्रवेश करून बेडरूममधील ठेवलेल्या रूपये ९० हजार किमंतीचे प्रत्येकी एक तोळा प्रमाणे तीन तोळयाचे तीन सोन्याचे धातूचे हार, ७५ हजार रूपये किमतीचे दोन सोन्याचा हातातील बांगडया वजन अंदाजे सव्वा तोळे, ३० हजार रूपये किमंतीचे दोन सोन्याचे धातूचे कानातील कुडया वजन अंदाजे प्रत्येक अर्धा तोळा, १२ हजार रुपये किमंतीचे दोन सोन्याचे धातूच्या लहान मुलींच्या कानातील कुडया अंदाजे ०.५ ग्रॅम, दोन लाख रूपये, ५०० रूपये दराच्या भारतीय चलनातील ४०० नोटा, असे एकूण पाच लाख २८ हजार ५०० रूपये किमंतीचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी चोरी व लबाडीचे हेतूने लंपास केला.

याबाबत रेवदंडा पोलिसांनी भादवि कलम ३३१(३), ३०५ (अ), याप्रमाणे अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अधिक तपास रेवदंडा पोलीस ठाण्याचे उपनिरिक्षक राजकुमार नंदगावे हे करत आहेत. अज्ञात चोरट्यांनी दिनांक २८ डिसेंबर ते २९ डिसेंबरदरम्यान रेसिडिशियल कॉलनी बिर्ला वसाहत कॉलनीतील बिल्डींग डी.५, रूम नंबर ६४, ई ५/५५, ई ४/४१ ई ४/४५ व ई ५/५५ या मधील रूमचे लॅच लॉक तोंडून अज्ञात चोरटयांनी खोलीमध्ये प्रवेश केला, मात्र बाकी रूममधील कोणती चीजवस्तू चोरीस गेल्या आहेत, यांचा उल्लेख नाही.

# मुरूडमधील पर्यटनस्थळांवर पोलिसांची करडी नजर



**मुरूड : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी मुरूड पर्यटन क्षेत्र सज्ज झाला आहे. सध्या सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. सकाळपासून मुरूड समुद्रकिनारी, ऐतिहासिक जंजिरा किल्ला, काशिद, खोरा बंदर, खोकरी असे विविध पर्यटन क्षेत्र ठिकाणी मुंबई, पुणे, सातारा, नाशिक, पनवेल याठिकाणी चे पर्यटक दाखल झाले आहेत.

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि २०२५ या नवीन वर्षाचे स्वागत जल्लोषात करण्यासाठी हॉटेल्स, रेस्टॉरंट, रिसॉर्टकडूनही तयारी करण्यात आली आहे. यानुसार विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. तसेच विविध लज्ञतदार पदार्थांची मेजवानीही असणार आहे. त्यासोबतच अनेकांच्या घरी हाऊस पार्टीचीही तयारी करण्यात येणार आहे. अनेकजण आपल्या मित्र-मैत्रिणी, कुटुंबियांसह नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी सज्ज झाले आहेत. तर बहुतांश पर्यटन स्थळांवरील हॉटेलचे बुकींग हाऊसफुल्ल झाले आहे.

नवीन वर्षाचं जंगी स्वागत होणार आहे. नव्या वर्षाच्या स्वागतासाठी मुरूडकर सज्ज झालेत, मात्र नव्या वर्षाचे स्वागत करताना कायदा सुव्यवस्था धोक्यात येणार नाही यासंदर्भातील काळजी घेण्यासाठी आणि कोणताही अनुचित प्रकार टाळण्यासाठी मुरूडच्या रस्त्यांवर पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

थर्टीफर्स्टच्या निमित्ताने चालणाऱ्या पार्ट्यांवर पोलिसांचे विशेष लक्ष असणार आहे. त्याचप्रमाणे ट्राफीक पोलिसांनी 'ड्रंक ॲण्ड ड्राइव्ह'च्या विरोधात विशेष मोहीम राबवण्याची तयारी केली आहे. ३० तारखेच्या रात्रीपासूनच मुरूडमध्ये अनेक ठिकाणी थर्डी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर नाकाबंदी आणि तपासणी सुरू झाली आहे.

# सहभाग आणि सहकार्य हाच 'नैना'च्या यशस्वीतेचा मंत्र

## सिडकोचे प्रसिद्धीपत्रक

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

नैना क्षेत्राच्या नियोजन आणि विकासाची जबाबदारी असलेल्या सिडकोने, विकास प्रक्रियेत जमीनमालकांशी सहकार्य करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. दरम्यान, नैना क्षेत्रातील अवैध बांधकामे आणि त्या संदर्भातील सिडकोच्या धोरणांची चर्चा केली असल्याचे सिडकोच्या प्रसिद्धीस पत्रकात म्हटले आहे.

हा एक संवेदनशील उपक्रम आहे जो लोकांचे विस्थापन टाळण्यासाठी करण्यात आला आहे. नैना प्रकल्प, नगर रचना परियोजनेच्या अनोख्या जमिनीच्या विकास मॉडेलवर आधारित आहे, जो गावकऱ्यांच्या आणि स्थानिकांच्या गरजांची संवेदनशीलतेने पूर्तता करतो. बहुतेक अंतिम भूखंड त्यांच्या मूळ ठिकाणी देण्यात आले आहेत त्यामुळे विस्थापन होत नाही, असे सिडकोच्या पत्रकात नमूद आहे.

नैना क्षेत्रात ९४ गावांचा समावेश असून त्यातील ९२ गावे पनवेल तालुक्यातील आणि २ उरण तालुक्यातील आहेत. या क्षेत्राकरीता सुसंयोजित विकास योजना सिडकोने तयार केली आहे. १० जानेवारी २०१३ पासून शासनाने अधिसूचित केलेल्या या क्षेत्रात कोणत्याही बांधकामासाठी नैना बांधकाम परवाना विभागाकडून पूर्व परवानगी घेणे अनिवार्य केले आहे. याद्वारे योजनाबद्ध विकास शक्य आहे, आणि नगर रचना परियोजनांच्या अंमलबजावणीला टप्प्याटप्प्याने विकसित करणे शक्य होत आहे.

नगर रचना परियोजनांच्या अंमलबजावणीमध्ये महत्त्वपूर्ण प्रगती दिसून येत आहे. नगर रचना परियोजना १ आणि २ ला शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे. नगर रचना परियोजना ३ ते ७ ला प्राथमिक मंजुरी मिळालेली आहे, तर नगर रचना परियोजना ८ ते १२ साठी मसुदा योजनांकरीता लवादांची प्रक्रिया सुरू आहे. या टप्प्याटप्प्यांच्या मंजुरींमुळे नैनाच्या योजनाबद्ध विकास दृष्टिकोनाची पुष्टि झाली आहे. नगर रचना परियोजना १ आणि २ साठी प्रॉपर्टी कार्ड वितरणासाठी तयार आहेत आणि अंतिम भूखंडांचे हस्तांतरणही सोबतच शक्य आहे. जमीनमालकांच्या सहकार्यानेच प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीला चालना मिळू शकेल, असे सिडकोच्या पत्रकातून सांगण्यात आले आहे.

नैना क्षेत्रातील एकात्मिक पायाभूत सुविधा विकास लवकरच सुरू होणार आहे, मात्र जमीनमालकांच्या सहकार्यानेच निर्धारित क्षेत्रात प्रवेश शक्य आहे. सिडकोने सर्व भागधारकांना याबाबत आवाहन केले आहे की, योजनाबद्ध आणि व्यवस्थित विकासाच्या दीर्घकालीन फायद्यांचा विचार करता सर्वांनी एकत्र येऊन यासाठी सहकार्य करावे, असे सिडकोच्या पत्रकात म्हटले आहे.

# तृतीयपंथींकडून रस्त्यांवर वेश्या व्यवसाय

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील विविध ठिकाणच्या पोलीस हद्दीसह इतर विविध सार्वजनिक ठिकाणी रात्री उशीरापर्यंत तृतीयपंथीयांकडून बिनधास्तपणे अश्लील वर्तन करून वेश्या व्यवसायासारखे अनैतिक प्रकार केले जात असल्याने याबाबत स्थानिक रहिवाशांनी संताप व्यक्त करून सदर ठिकाणी पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

अनेक ठिकाणी तृतीयपंथी हे अश्लील कृत्य व वेश्या व्यवसाय करीत असताना मिळुन येत आहेत. त्यामध्ये कळंबोली स्टील मार्केट परिसर जेथे ट्रक उभे केले जातात त्या ठिकाणी, आसुडगाव परिसर, सायन-पनवेल महामार्ग, खांदा वसाहत, खारघर परिसर आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणात बेलपाडा हायवे, कळंबोली हायवे व ट्रक टर्मीनल येथे उभ्या असलेल्या ट्रकच्या मागे सायंकाळनंतर ते रात्री उशीरापर्यंत तृतीयपंथी लोक सार्वजनिक ठिकाणी अतिशय बिभत्सपणे बिनधास्त अश्लील वर्तन, वेश्या व्यवसाय सारखे अनैतिक प्रकार करत असतात.

या प्रकारांमुळे त्या परिसराची नाहक बदनामी होत आहे. या तृतीयपंथीयांकडुन चालणाऱ्या अनैतिक कृत्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

# ट्रक उलटून चालक जखमी

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-पुणे महामार्गावर खांदेश्वर पोलीस स्टेशन हद्दीत ट्रक उलटल्याची घटना घडली. यात चालक जखमी झाला आहे.

यातील ट्रक (जीजे १६ एव्ही ११३३) वरील चालक सुशील कुमार चेतन भाई पटेल (वय ३१ वर्ष रा. जम्बुसार,भरूच, गुजरात) हे मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरून मुंबई बाजूकडे वाहन चालवत घेऊन जात असताना किमी १/८०० येथे आले. अचानक त्यांचे ट्रकचा एक्सल तुटल्याने ट्रकचे टायर निघून पडल्याने त्यांचे ट्रकवरील नियंत्रण सुटून ट्रक डाव्या कुशीवर पलटी होऊन अपघात झाला. या अपघातामध्ये ट्रक चालकाच्या उजव्या हाताला खरचटले असून किरकोळ दुखापत झाली आहे.

अपघातग्रस्त वाहन आय आर बी क्रेनच्या सहाय्याने रोडचे बाजूला केले असून वाहतूक सुरळीत चालू आहे. अपघाताचे ठिकाणी महामार्ग पोलीस, आय आर बी स्टाफ व पळस्पे मोबाईल वरील स्टाफ हजर होते.

# नवीन वर्षात महावितरण वीज बिलात देणार सूट

**मुंबई : प्रतिनिधी**

नूतन वर्षाची भेट म्हणून गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडल्यानंतर तत्काळ वीज बिलात एकरकमी १२० रुपये सूट देण्याची घोषणा महावितरणने केली आहे.

महावितरणकडून 'कागद वाचवा, पर्यावरण वाचवा' या संकल्पनेनुसार गो-ग्रीन सेवा राबविण्यात येत आहे. त्यानुसार यापूर्वी या योजनेंतर्गत ग्राहकांना मासिक वीज बिलात १० रुपये सूट देण्यात येते, मात्र आता यापुढे पहिल्याच बिलात पुढील बारा महिन्यासाठी तत्काळ १२० रूपये एकरकमी सवलत मिळणार आहे.

गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांना महावितरणकडून दरमहा छापील कागदी बिलाऐवजी ई-मेलद्वारे वीज बिल पाठविण्यात येते. शिवाय गो ग्रीन ग्राहकांना मासिक वीज बिलात १० रुपये सूट देण्यात येते.

महावितरणने गो ग्रीन ग्राहकांसाठी हा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता यापुढे गो ग्रीन सेवा निवडणाऱ्या ग्राहकांना दरमहा ऐवजी पहिल्याच महिन्यातील वीज बिलात एकरकमी १२० रुपये सूट देण्यात येणार आहे.

महावितरणच्या तीन कोटी लघुदाब ग्राहकांपैकी अद्यापपर्यंत चार लाख ६२ हजार म्हणजेच १.१५ टक्के ग्राहकांनी गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडला आहे. भविष्यात हे प्रमाण वाढावे, या हेतूने महावितरणने गो ग्रीन पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांना वीजबिलात तत्काळपणे १२० रुपये एकरकमी सुट देण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व नोंदणीकृत वीज ग्राहकांना महावितरणकडून गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडण्यासाठी एसएमएस पाठविण्यात येणार आहे. गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडल्यानंतर तत्काळ वीज बिलात एकरकमी १२० रुपये सूट देण्यात येणार आहे. त्यानंतर पुढील वर्षभर व सेवेसाठी नोंदणी रद्द करेपर्यंत नोंदणीकृत ई-मेलवर वीज बिल पाठविण्यात येणार असून त्यापुढे दरमहा वीज बिलात १० रुपये सूट देण्यात येणार आहे.

ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे महावितरणने आवाहन केले आहे. गो ग्रीन सुविधेचा लाभ घेण्यासाठी महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळाला भेट द्या व गो ग्रीन चा पर्याय निवडा.

# मोफत कर्करोग तपासणी व जनजागृती शिबिर

## राजिप माजी अध्यक्ष ॲड. निलिमा पाटील यांची उपस्थिती

**पेण : प्रतिनिधी**

शिवोहं प्रतिष्ठानच्या विद्यमाने युवा नेते भुषण कडू यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून १८ वर्षांवरील पुरुष व महिलांकरीता मोफत कर्करोग तपासणी व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराच्या उद्‌घाटनावेळी राजिपच्या माजी अध्यक्ष ॲड. निलिमा पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, भुषणभाईने आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करून जनसामान्यांच्या आरोग्याचा विचार केला आहे. आज वाढदिवस म्हटल्यानंतर केक कापणे, मटणाचे जेवण करणे, रात्रीचा नाच मौज मजा करणे असे प्रकार करत असतात, परंतु आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून आरोग्य तपासणीचा विचार करणे हे ही कौतुकाचे आहे.

आपण जनसामान्यांना उपयोगी पडल्यास जनसामान्य आपल्याला उपयोगी पडतात आणि भविष्यात भुषण भाई नक्कीच है जनसामान्य आपल्याला जेव्हा त्यांची गरज आपल्याला भासेल तेव्हा ते उपयोगी पडल्याशिवाय राहणार नाहीत आज आपण या कर्करोग तपासणी बरोबर हिंदू भुषण




दिनदर्शकिचे अनावरण व लोकार्पण केलेत हेदेखील कौतुकास्पद आहे. शेवटी निलिमा पाटील यांनी भूषण कडू यांना वाढदिवसाच्या व पुढच्या कारकीर्दीसाठी शुभेच्छा दिल्या

या वेळी व्यासपिठावर भूषण कडू यांचे आईवडील, नगरसेवक प्रकाश पाटील, नगरसेवक संतोष पाटील, संजय म्हात्रे, पत्रकार विजय गोकल, पत्रकार अनिस मनियार, डॉ. भारती प्रितम भोईर, डॉ सोनाली तेलग, भूषण कडू यांची पत्नी अश्विनी कडू अदी मान्यवर उपस्थित होते तर या शिबिराला मा. सभापती राजा म्हात्रे, उदयोजक प्रभाकर पाटील, कमर्शियल ज्येष्ठ आर्टीस्ट योगेश निखारे, प्रसिद्ध विधीतज्ञ नितीन पाटील, युवा नेते महेश पाटील, उद्योजक जयेश पाटील, आबेघर मा सरपंच प्रमोद लबाडे, उद्योजक राजन पाटील अर्दीनी सदिच्छा भेट दिली या शिबिरात एकूण ७५ हुन जास्त लाभार्थ्यांनी लाभ घेतला तर या शिबीरासाठी कर्करोग प्रतिबंध विभाग खोपोली, टाटा मेमोरियल सेंटर मुंबई यांनी सर्वस्वी मदत केली तर शिवोहं प्रतिष्ठानच व भूषण कडू यांचे हितचिंतक अजित जाधव, राजेंद्र पाटील, रोगी धुसिया, लखन शिंदे, रोहन दळवी, किशोर माळी, दिनेश विभुत, तुषार माळी, आदींनी मेहनत घेतली.

# आरटीएस अपीलांचे कामकाज दर शुक्रवारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पनवेल, उरण, खालापूर व कर्जत या तालुक्यातील प्राप्त अपिलांचे अनुषंगाने, अपर जिल्हाधिकारी रायगड यांचे स्तरावरील पनवेल, उरण, खालापूर आणि कर्जत या तालुक्यांतील आरटीएस अपीलांची सुनावणी यापुढे आठवड्याच्या दर शुक्रवारी अपर तहसीलदार पनवेल यांचे कार्यालयात वरील मजल्यावर, खोली क्रमांक ३०६, प्रशासकीय भवन, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके ऑडीटोरीयम समोर, जूने पनवेल, पिनकोड ४१०२०६ येथे घेण्यात येणार आहे.

पनवेल, उरण, खालापूर व कर्जत नागरीकांनी याची नोंद घेऊन तसेच अपर केलेल्या पत्त्यावर अपीलांच्या सुनावणीसाठी उपस्थित रहावे, असे अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांनी कळविले आहे.

### दुखवटा

**योगेश वैद्य**



**कर्जत :** तालुक्यातील लाडीवली येथे राहणारे योगेश कृष्णाजी वैद्य (वय ५२) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा असा परिवार आहे.

## निवडक

### विवाहिता हरवल्याची तक्रार



**पनवेल :** किरकोळ भांडणाचा राग मनात धरून एक विवाहित महिला राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. आरती बाळासो यादव (२८ रा.नवनाथनगर झोपडपट्टी) असे या महिलेचे नाव असून उंची पाच फुट सहा इंच, बांधा मध्यम, रंग गहुवर्णीय, केस काळे असून अंगात साडी नेसलेली तसेच तिच्या डाव्या हाताच्या मनगटावर बाळासो असे गोंदलेले आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा हवालदार राजेंद्र केणी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पनवेलमधून रिक्षाची चोरी

**पनवेल :** प्रभु आळी येथून ४० हजार रुपये किंमतीची रिक्षा अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. अशोक तांबोळी यांनी त्यांची ४० हजार रुपये किंमतीची बजाज कंपनीची रिक्षा (एमएच-४६-एसी-०४२३) ही उषा प्रभा सोसायटीच्या परिसरात उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर रिक्षा चोरुन नेली आहे. याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# उरण बायपास लवकरच कार्यान्वित

## आमदार महेश बालदी यांचा पाठपुरावा

**उरण : प्रतिनिधी**

उरण बाह्यवळण (बायपास) मार्ग येत्या २०२५ मध्ये पूर्णत्वास जाण्याची आशा निर्माण झाली आहे. यातील नगर परिषद हद्दीतील जमिनीचे भूसंपादनाचा अथडला ही लवकरच दूर होईल असा विश्वास उरण नगर पालिकेने व्यक्त केला आहे. त्यामुळे उरणच्या प्रवासी व नागरिकांना दिलासा मिळणार आहे.



उरण शहर आणि परिसराचे झपाट्याने नागरीकरण सुरू आहे. येथील लोकल, रस्ते मार्ग, जलमार्ग यांनी जोडले गेले आहे. त्यामुळे नागरीवस्ती वाढू लागली आहे. त्यामुळे शहरातील वाहनामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीत भर पडली आहे. उरणच्या सर्व मार्गावर सततच्या कोंडीने प्रवासी, नागरिक आणि वाहनचालक त्रस्त झाले आहेत. हा मार्ग लवकरात लवकर पूर्ण करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. उरण बाह्यवळण मार्गाचा प्रस्ताव २००१ साली पहिल्या युती सरकारच्या काळात उरण शहरातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून शहराला जोडणाऱ्या उरण-पनवेल या मुख्य मार्गालगत मोरा मार्गाला जोडणारा बाह्यवळण मार्ग प्रस्तावित होता. त्यानंतर २००८ला माध्यमातून सिडकोच्या निधीतून बाह्यवळण मार्गाचा प्रस्ताव तयार करण्यात आला.

या मार्गात कांदळवन असल्याने त्यांच्या परवानग्या मिळण्यासाठी अनेक वर्षे लागली. त्यामुळे या मार्गाच्या खर्चात वाढ झाली. आता ४५ कोटींच्या घरात या बाह्यवळण मार्गाचा खर्च गेला आहे. या मार्गाचे काम वेगाने व्हावे याकरिता उरणचे आमदार महेश बालदी यांनी पाठपुरावा केला. या मार्गाच्या उभारणीसाठी आवश्यक जमिनीसाठी शासनाने निधी उपलब्ध करून द्यावी यासाठी प्रयत्न करीत आहेत.

सध्या सिडकोच्या माध्यमातून तयार करण्यात येणाऱ्या या एलिव्हेटेड मार्गाचे काम वेगाने सुरू आहे, मात्र या मार्गाला जोडणाऱ्या उरण नगर परिषदेच्या हद्दीतील भूखंडाचे भूसंपादन पनवेलच्या उपविभागीय अधिकाऱ्यांकडून येथील जमिनीच्या अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू आहे, मात्र त्यासाठी लागणारा निधी मिळावा याकरिता शासन दरबारी प्रयत्न सुरू आहेत.

उरणच्या बाह्यवळण मार्गासाठी जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू आहे. यासाठीचा निधी येत्या दोन महिन्यांत उपलब्ध होईल त्यानंतर मार्गाचे काम मार्गी लागेल, असा विश्वास उरण नगर परिषदेचे अभियंता निखिल दोरे यांनी दिली आहे.

# चित्रांद्वारे 'दिबां'ची माहिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड, ठाणेच नव्हे; तर संपूर्ण राज्यातील स्थानिक जनतेच्या न्याय्य हक्कासाठी लढणारे भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे झुंजार नेते दि. बा. पाटील हे असामान्य नेतृत्व होते. त्यांचे विचार नव्या पिढीला समजावे व प्रेरणा मिळावी, यासाठी पनवेल महापालिकेच्यावतीने लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयातील भिंतींवर चित्रांद्वारे 'दिबा'साहेबांची माहिती प्रदर्शित करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर तसेच दि.बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील यांनी विद्यालयाला भेट देऊन पाहणी केली.

या वेळी जे. डी. तांडेल, माजी नगरसेविका दर्शना भोईर, शहर अभियंता संजय कटेकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



# अल्पसंख्याक मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली आमदार रवींद्र चव्हाण यांची भेट



**मुंबई, पनवेल : रामप्रहर वृत्त**

अल्पसंख्याकांना प्रगतीच्या समान संधी मिळवून देण्यासाठी भाजप सदैव कटिबद्ध आहे. त्यामुळेच भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या माध्यमातून अनेक अल्पसंख्याक भाजप परिवारात सहभागी होत आहेत, असे मार्गदर्शन महाराष्ट्र संघटन पर्व प्रदेश प्रभारी आमदार रवींद्र चव्हाण यांनी केले. प्रदेश अल्पसंख्याक मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार चव्हाण यांची भेट घेतली. त्या वेळी ते बोलत होते.

या वेळी झालेल्या बैठकीत संघटन पर्व अंतर्गत सदस्य नोंदणी अभियानाचा आढावा घेण्यात आला. या वेळी इद्रीस मुलतानी, एजाज शेख, सय्यद अकबर, अशरफ वांकर, सलिम जहांगिर, बबलू सय्यद, मुश्ताक अ. दळवी, अबिद अली चौधरी, रियाज वंटमुरे, रिदा रशीद, सुलताना खान, निहाल शेख, सलीम बागवान, अब्दूल नजीर, रियाज शेख, सय्यद अब्बास, एल.एफ. जावेद आदी उपस्थित होते.

# पनवेल वाहतूक पोलिसांतर्फे जनजागृती अभियान

**पनवेल : वार्ताहर**

दारू पिवून आपल्या ताब्यातील वाहन चालवू नका, यासाठी वाहन चालक व मालकांमध्ये जनजागृती करण्यासाठी पनवेल शहर वाहतूक शाखेतर्फे शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी जनजागृती अभियान राबविण्यात आले.

पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मनोज महाडिक व पथकाने आज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर, नवीन पनवेल उड्डाण पुल परिसर यासह महत्वाच्या गर्दीच्या ठिकाणी आज जनजागृती अभियान राबवून दुचाकी तसेच चार चाकी वाहनावरील वाहन चालकांना दारु पिवून वाहन चालवू नका, असे आवाहन तसेच वाहन चालकाचे प्रबोधन करण्यात आले.



# पनवेल परिसरात वृद्ध व्यक्तीचा आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका ६५ ते ७० वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंगात राखाडी रंगाचा फूल बाह्याचा त्यावर लाल व पांढऱ्या रंगाच्या पट्ट्या असलेला स्वेटर आहे. मयत व्यक्ती अंगाने सडपातळ, चेहऱ्यावर पांढरी दाढी वाढलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील केदार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.









उलवे नोड : भाजप महिला मोर्चा अध्यक्ष निकिता निलेश खारकर यांनी वाढदिवसाचे औचित्य साधून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांचे आशीर्वाद घेतले. दोघांनीही निकिता खारकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर, धीरज ओवळेकर, युवा मोर्चा अध्यक्ष वितेश म्हात्रे, उलवे उपसरपंच जगदीश खारकर, चिटणीस सुहास गोंधळी, नंदकुमार ठाकूर आदी उपस्थित होते.




# उघड्यावरील अन्नपदार्थ खाऊ नयेत -डॉ. गुणे

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील दिघोडे गावातील एका टपरीवर उघड्यावरील शोरमा हा खाद्यपदार्थ खाल्याने अनेकांना पोटात मळमळणे - दुखणे, उलट्या, जुलाब सारखं वाटतं असल्याने पनवेल येथील गुणे रुग्णालयात आठ रुग्ण उपचार घेण्यासाठी दाखल झाले आहेत. तसेच मंगळवारी (दि.३१) एका शोरमा बाधित रुग्णाला रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. सध्या त्या रुग्णांची प्रकृती चांगली असली तरी नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्यांना संबंधित प्रशासन परवानगी देताच कशी, असा सवाल डॉ. गिरीश गुणे यांनी उपस्थित करुन लहान मुलांनी, नागरिकांनी उघड्यावरील अन्न पदार्थ खाऊ नयेत, असे आवाहन ही डॉ. गिरीश गुणे यांनी केले आहे.



दिघोडे बस स्थानकाजवळील उघड्यावर विकला जाणारा शोरमा हा खाद्यपदार्थ खाल्याने दिघोडे व इतर गावातील एकूण ४१ जणांना विषबाधा झाल्याची घटना शनिवारी घडली होती. रुग्णांनी तातडीने चिरनेर गावातील रवि क्लिनिक रुग्णालय गाठून रुग्णालयातील डॉक्टर प्रकाश मेहता यांच्या कडून प्रथम उपचार करून घेतले. त्यातील काही रुग्णांना उलट्या, जुलाब, इतर आजार उद्भवताच त्या रुग्णांनी पनवेल येथील गुणे रुग्णालयात, कोप्रोली येथील सिद्धिविनायक रुग्णालयात आणि उरण येथील पालवी रुग्णालयात तसेच इतर खाजगी रुग्णालयात उपचार घेण्यासाठी धाव घेतली. या घटनेचे वृत्त वाऱ्यासारख पसरताच नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले. तर शासकीय आरोग्य विभागाने तातडीने यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी तसेच शोरमा बाधित रुग्णांना मोफत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गावा गावात रुग्णांची तपासणी सुरू केल्याची माहिती तालुका आरोग्य विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

एकंदरीत डॉक्टर प्रकाश मेहता, डॉ गिरीश गुणे, डॉ.सिध्दराम अवंती पाटील, तालुका आरोग्य अधिकारी डॉ राजेंद्र इटकरे तसेच परिचारिका कर्मचारी यांच्या सतर्कतेमुळे शोरमा बाधित रुग्णांचे प्राण वाचले असले तरी अन्न व औषध विभाग प्रशासन, पोलीस यंत्रणा यांनी उरण तालुक्याकडे दुर्लक्ष न करता नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या उरण शहर व तालुक्यातील गावा गावातील नाक्यांवर राजरोसपणे उघड्यावर विक्री करणाऱ्या खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# राहुल कर्डिले यांनी स्वीकारला सिडकोच्या जॉईंट एमडीपदाचा कार्यभार

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

राहुल कर्डिले यांनी सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार पूर्वीचे सहव्यवस्थापकीय संचालक (जॉईंट एमडी) दिलीप ढोले यांच्याकडून मंगळवारी (दि.३१) सिडको भवन येथे स्वीकारला.



राहुल कर्डिले हे सन २०१५च्या तुकडीतील महाराष्ट्र कॅडरचे भारतीय प्रशाकीय सेवा (आयएएस) अधिकारी आहेत. राहुल कर्डिले हे अभियांत्रिकी (इन्स्ट्रूमेन्टेशन) पदवीधर आहेत. यापूर्वी त्यांनी अधिसंख्य सहाय्यक जिल्हाधिकारी, अमरावती, सहाय्यक जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी, सेलू, जि. परभणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषद आणि सहआयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), मुंबई ही पदे भूषवली आहेत. सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी राहुल कर्डिले हे जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, वर्धा म्हणून कार्यरत होते.

# योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या महिला बालकल्याण विभागाच्या वतीने विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

समाज विकास विभागांतर्गत पनवेल महापालिका क्षेत्रातील आर्थिक दुर्बल घटकातील मागासवर्गीय एकल महिलांच्या १० वी व १२वी चे शिक्षण घेत असलेल्या मुलांना शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. यामध्ये इयत्ता दहावीच्या मुलांना १० हजारची आर्थिक मदत करण्यात येत आहे. तसेच इयत्ता बारावीच्या मुलांना १५ हजारांची आर्थिक मदत करण्यात येत आहे.

महिला व बालकल्याण विभागातर्फे दिनांक १ एप्रिल २०२१ नंतर कॅन्सर या दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या महिलांना व मुलांना, मुलींना फक्त एकदाच अर्थसहाय्य देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत कॅन्सर या आजाराचे निदान झालेल्या रुग्णास रुपये ५० हजारांचे अर्थसहाय्य दिले जाते.



## संपादकीय

# निर्धाराला बळ मिळो!

वाल्मिक कराड पोलिसांना शरण आल्याने आता संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या चौकशीला वेग येईल अशी अपेक्षा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी आम्ही कोणालाही मोकळे सोडणार नाही. ज्याचा ज्याचा या प्रकरणाशी संबंध असेल, त्याला त्याला कठोर कारवाईला तोंड द्यावे लागेल. गुंडांचे राज्य इथे चालणार नाही असे पुन्हा ठामपणे स्पष्ट केले आहे. त्यांच्या शब्दांवर महाराष्ट्राच्या जनतेचा विश्वास आहे.

**महाराष्ट्रातील जनतेने अलिकडेच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्ष आणि महायुतीच्या सरकारला मोठ्या विश्वासाने प्रचंड जनादेश दिला आहे. या विश्वासाला तडा जाईल अशा कोणत्याही गोष्टीला या सरकारला थारा देता येणारच नाही आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील हे सरकार निश्चितपणे आणि निर्धाराने त्याची पुरेपूर काळजी घेईल याची खात्री जनतेला आहे. म्हणूनच लोकांनी मोठ्या यशाचा कौल त्यांच्या बाजूने दिला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकासाच्या वाटेवर मोठ्या वेगाने वाटचाल करण्याचा निर्धार करीतच सरकारने राज्यातील कामकाजाला सुरुवात केली, परंतु सुरूवातीच्याच दिवसांत समोर आलेल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणाने नागपूरच्या हिवाळी अधिवेशनातही पडसाद उमटले. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी अजित पवार यांनी बीडमध्ये जाऊन देशमुख कुटुंबियांची भेट घेतली होती व या प्रकरणीच्या सूत्रधारांवर कारवाईचा इशाराही दिला होता. या प्रकरणामुळे बीडमधील गुंडगिरी व एकंदर कायदा व सुव्यवस्थेची तेथील परिस्थिती याची चर्चा चव्हाट्यावर आली. देशमुख यांच्या हत्या प्रकरणी चर्चेचा रोख जिल्ह्यातील बड्या नेतेमंडळींकडे वळू लागला. बडी नेतेमंडळी आणि त्यांच्या छत्रछायेमुळे बेमुर्वतखोर वर्तन करणारे त्यांचे डावे-उजवे हात यांची प्रचंड चर्चा मुख्य प्रवाहातील माध्यमांत तसेच समाजमाध्यमांमध्येही रंगू लागली आणि अजुनही सुरू आहेच. संतोष देशमुख यांची हत्या अतिशय निर्घृणपणे झाली होती व त्यामुळेच त्या संपूर्ण परिसरातील जनता हादरून गेली आहे हे वास्तव गंभीर आहेच. सरकारमधील सुजाण नेतेमंडळीही या प्रकरणाने अस्वस्थच झाली आहेत. नेत्रदीपक यश मिळवून मोठ्या उत्साहाने विकास कामांना सुरूवात करतानाच हे असे गंभीर प्रकरण समोर आले आहे. पराभवाने खचलेल्या विरोधकांना यातून आयतेच कोलित मिळाले आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येशी वाल्मिक कराड याचा संबंध असल्याचा आरोप विरोधकांकडून सतत केला जातो आहे. त्याला अटक का केली जात नाही असा प्रश्न उपस्थित केला जात असतानाच, वाल्मिक कराड मंगळवारी पुणे पोलिसांना आणि सीआयडीला शरण आला, पण शरणागती पत्करण्यापूर्वी वाल्मिक कराडने एक व्हिडिओ शेअर करत आपला या हत्या प्रकरणाशी संबंध नसल्याचा दावा केला. खंडणी प्रकरणी आपण पोलिसांना शरण जात असल्याचे त्याने या व्हिडिओत सांगितले. कराड स्वत:हून शरण आला असल्याने या प्रकरणात पोलिसांनी काय कारवाई केली असा सवालही आता विरोधकांकडून उपस्थित केला जातो आहेच, मात्र येत्या वर्षात या प्रकरणी न्याय्य कारवाई होऊन अशा प्रकारच्या गुंडगिरीला अटकाव होईल अशी आशा आहे. सरकारनेही त्याच निर्धाराने पावले उचलावीत. नव्या वर्षाची सुरूवात होताना गेले काही दिवस दाटून आलेला हा नकारात्मकतेचा अंध:कार दूर व्हावा. महायुतीच्या सरकारला सुयोग्य पद्धतीने लोकाभिमुख कारभार करण्यासाठी आगामी काळात आणखी बळ मिळावे.**

# नवीन वर्ष, नवीन बदल, नवीन आशा

आज नवीन वर्षाला पहिला दिवस. २०२४ या वर्षाला निरोप देत, येणाऱ्या २०२५ या नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी आपण सर्व उत्सुक आहोत. नवीन वर्षामध्ये अनेक गोष्टी कळत-नकळतपणे बदलतील. नव्याने काही गोष्टी आपल्या आयुष्यात येतील. त्यातील एक म्हणजे आपल्या घरातील भिंतीवरचे कॅलेंडर. हल्ली आपल्या प्रत्येकाकडे मोबाईल असला तरीही आपण नवीन वर्ष सुरू झाले असल्याने न चुकता भिंतीवरचे कॅलेंडर बदलणार आहोत, पण आपण कधी विचार केलाय का? आपल्या घरातील भिंतीवर लटकलेले कॅलेंडर दरवर्षी नवीन असते, तर खिळा मात्र वर्षानुवर्षे तोच असतो. हा खिळा एकाच ठिकाणी वर्षानुवर्षे राहत असल्याने एक दिवस तो गंजतो आणि त्याचे तिथले अस्तित्व संपून जाते. आपल्या आयुष्याच्या बाबतीतसुद्धा बऱ्याचदा असचं काही घडत असतं.

आयुष्याच्या प्रवासामध्ये एकामागून एक दिवस कसे जातात कळतं नाही. या प्रवासात अनेक गोष्टी जलद गतीने बदलतात. कधी मनासारखं, तर कधी मनाविरुद्ध घडत जातं. जसे न सांगता आयुष्यामध्ये नकळत काही माणसं येतात तसंच न सांगता काही माणसं जातात. काही थांबतात, काही पुढे जातात, काही सोडून जातात, तर काही शिकवून जातात. कधी वाईट तर कधी चांगले, कधी बरे तर कधी खरे, कधी छोटे तर कधी मोठे प्रसंग आयुष्यामध्ये येत राहतात, जात राहतात. आयुष्यामध्ये आलेले असे कितीतरी प्रसंग असतात जे आपल्याला वेळोवेळी अनेक गोष्टी शिकवत असतात, पण बऱ्याचदा आपण त्याकडे दुर्लक्ष करत असतो. एवढच कशाला तर अनकेदा आपण त्यातून काही नवीन शिकण्याचा साधा प्रयत्न सुद्धा करत नाही. त्यामुळे आपली परिस्थिती आणि आपल्या तक्रारी जन्मभर काहीही केले तरीही काही संपत नाही.

अनेकदा आपल्याकडे वेळ असताना आपण स्वतःमध्ये आवश्यक असलेला बदल करून घेत नाही. आयुष्यात ज्या चुका आपण पूर्वी केलेल्या असतात, त्याच चुका पुन्हा पुन्हा आपण करत राहतो. त्यामुळे बऱ्याचदा त्याचे परिणाम आपल्याला जन्मभर भोगावे लागत असतात, कारण आपल्या छोट्या-छोट्या चुका कधी मोठ्या होऊन जातात याचा पत्तासुद्धा बऱ्याचदा आपल्याला लागत नाही आणि एकदा हातातून सुधारण्याची वेळ निघून गेली की, सावरणे कठीण होऊन जाते. त्यामुळे हळूहळू आपल्या सुंदर अशा आयुष्याला खिळ्यासारखा गंज चढत जातो आणि गंज चढलेल्या गोष्टी अधिक काळ टिकून राहत नसतात हेही तितकेच खरे. तेव्हा चुकून आपल्या आयुष्याच्या खिळ्याला एकदा गंज चढला की, आपले अस्तित्व संपले समजायचे. त्यामुळे स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवायचे असेल तर नवीन वर्षात भिंतीवरील कॅलेंडर आणि खिळ्यासोबत आधी स्वतःमध्ये बदल घडविला पाहिजे.

आयुष्यात आलेली कोणतीही वेळ आपल्यासाठी कधीही थांबत नसते. जसे हे वर्ष गेले अगदी तसेच पुढील वर्षसुद्धा बघता-बघता निघून जाईल. त्यामुळे नंतर करू? वाट बघू? या भ्रमात राहू नका. जेवढ्या लवकर आपण आपल्यामध्ये बदल करून घेऊ तेवढ्याच लवकर आपण शारीरिकदृष्ट्या आणि मानसिकदृष्ट्या मजबूत होऊ. त्यामुळे गेल्या वर्षभरामध्ये ज्या गोष्टी आपल्या मनाविरुद्ध घडल्या असतील किंवा ज्यांच्यामुळे मनाविरुद्ध घडले असेल त्यांना सरसकट बदलवून टाकावे, कारण आजच्या काळात भावनिक होण्यापेक्षा प्रॅक्टिकल होणे गरजेचे आहे आणि शेवटी एकच सांगणं आहे की, माणसं गमवायला घाबरू नका, कारण रिकाम्या जागा लवकर भरल्या जातात.

आपण नेहमी म्हणत असतो की, वेळेसोबत माणसं बदलतात. हो बदलतात ना माणसं. मग आपल्याला कुणी अडविले आहे का? आपण का बदलत नाही? बदल हा निसर्गाचा नियम आहे. त्यामुळे वेळेसोबत प्रत्येकाला बदलावं लागतं असतं. जी माणसं स्वतःमध्ये वेळेसोबत बदल करून घेत नाही ती माणसं आयुष्यात कधीच बदल घडवून आणू शकत नाही. त्यामुळे येणाऱ्या नवीन वर्षात लोक काय म्हणतील याचा विचार न करता आधी स्वतःला बदलविले पाहिजे. आपण बदलणार तरच आपल्या व्यक्तीमत्वात बदल घडणार आहे, कारण आयुष्यात जी माणसं बदलतात तिचं माणसं उंच भरारी घेत असतात आणि वेळेसोबत जी माणसं बदलत नाही ती माणसं तिथेच आयुष्यभर गंजत राहतात. मग आता आपणच ठरवायचं आपल्याला गंजायचे आहे की चमकायचे?

बऱ्याचदा असे होते की, सुरुवातीच्या काही दिवसांमध्ये आपण जे काम हाती घेतो ते काम खूप जोशाने, उत्साहाने, आनंदाने आणि ताकदीने आपण प्रयत्न करत असतो पण नंतर काम करण्याचा वेग अनेकदा मंदावतो आणि आपण ध्येयापासून हळूहळू दूर होत जातो. यामागील कारण एकच असते की, आपण आपल्या कामात सातत्य ठेवत नसतो. म्हणून वर्षाच्या पहिल्या दिवशी असलेला जोश, उत्साह अगदी वर्षाच्या शेवटच्या दिवसांपर्यंत कायम टिकलाच पाहिजे. यासाठी प्रत्येकांनी खबरदारी घ्यायलाच हवी, कारण निरंतर केलेल्या कामातूनच चांगले फळ मिळत असते.

आपल्याला नेहमी वाटते की, आपण खूप काही करू शकतो. तशी मनाचीसुद्धा तयारी झालेली असते. आपण त्यासाठी प्रयत्नदेखील करत असतो, पण आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल, तर आधी स्वतःला सुरक्षित ठिकाणाहून बाहेर काढले पाहिजे. क्योंकी कुत्ता भी घर में शेर होता हैं! म्हणून आपल्या सुरक्षित ठिकाणापासून आधी बाहेर निघाले पाहिजे, कारण घरट्यात बसून पाखरं उडणे शिकत नसतात. त्यामुळे मित्रांनो, उडायचं असेल तर घरट्यातून बाहेर पडलं पाहिजे आणि एकदा हात-पाय हलविले की, आपोआपच उडणं शिकता येतं. म्हणून घराबाहेर पडून बाहेरची परिस्थिती अनुभवून बघावं. अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य करून दाखवावं आणि महत्वाचे म्हणजे स्वतःला ओळखावं, कारण बऱ्याचदा समोरच्या व्यक्तीबद्दल सांगा म्हटलं की, आपली गाडी कितीतरी वेगाने नॉनस्टॉप धावते, पण आपल्या विषयी सांगताना अनेकदा ब्रेक मारावा लागतो. म्हणून या नवीन वर्षाच्या सुरुवातीला मी कोण आहे? या प्रश्नाचे उत्तर प्रत्येकांनी शोधले पाहिजे, कारण संपूर्ण आयुष्य निघून जाते, पण स्वतःचा शोध काही लागत नाही. म्हणून आधी स्वतःला ओळखा. स्वतःसाठी वेळ द्या. स्वतःला आयुष्यात जे काही करायचे आहे त्याबद्दल ठामपणे निर्णय घेऊन पुढची दिशा ठरवा.

आयुष्यात जेवढ्या जास्त अडचणी येतील तेवढ्याच जास्त प्रमाणात आपल्याला शिकायला मिळेल, कारण आयुष्यात ठेच लागलीच पाहिजे, तेव्हाच समजेल न की, रक्तबंबाळ झालं की काय होतं? आणि वेदना काय असतात? म्हणून आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक क्षणापासून अनुभव घ्या मग ते क्षण सुखाचे असो वा दुःखाचे. त्यातून नेहमी शिकण्याचा प्रयत्न करत राहावं आणि नेहमी आयुष्यात पुढे जाण्याचा आपला प्रयत्न असला पाहिजे.

चांगल्या, गुळगुळीत रस्त्यांवर चालणाऱ्यांना माहीत नसतात की, दहा वर्षांपूर्वी रस्ते कसे होते. अगदी तसंच सर्व आयते मिळणाऱ्याना माहीत नसते की अडचणी, संघर्ष, मेहनत, समस्या, अपयश काय असतात? म्हणून आपल्याकडे काहीच नाही म्हणून निराश होऊ नका, तर स्वतःला नशीबवान समजा की, आपल्याला काहीच नाही म्हणूनच शून्यातून विश्व निर्माण करण्याची सुवर्णसंधी आपल्याला मिळाली आहे. जे की आयुष्यात कित्येकांना मिळत सुद्धा नाही. म्हणून आव्हानांना स्वीकारा. पुढे जात रहा. परिस्थितीचे भांडवल करत राहण्यापेक्षा स्वतःला मजबूत बनवून स्वतःचे सुंदर आयुष्य घडवा. दिवस येतात, दिवस जातात, पण गेलेला प्रत्येक दिवस हा आठवण बनून कायम सोबत असतात. म्हणून येणाऱ्या प्रत्येक दिवसाचा मनसोक्त आनंद घ्या. जसा गेलेला व्यक्ती परत येत नाही अगदी तसाच आज गेलेला दिवस परत आयुष्यात पुन्हा कधीच येत नाही. म्हणून आयुष्यात प्रत्येक दिवसाचे महत्त्व आहे. प्रत्येक दिवस हा आपण चांगल्या कामासाठी उपयोगामध्ये आणला पाहिजे, कारण आयुष्याच्या या प्रवासात आपण जोपर्यत आहोत तोपर्यंत एक प्रवासी म्हणूनच आपल्याला प्रवास करायचा असतो आणि कोणत्या दिवशी आपल्या आयुष्याचा हा प्रवास थांबेल हे निश्चितपणे सांगता येत नाही.

गेल्या वर्षभरात आपल्या आयुष्याच्या प्रवासात जे काही बरे वाईट घडले आहे, ते मागे सोडून, पुढे जाण्याची आता नवीन वर्षात चांगली वेळ आहे. काही त्रासदायक आठवणी, काही दुःखद अनुभव हे सर्व जुन्या कॅलेंडरसोबत मागे ठेवून, नवीन पानावर एक सुंदर सुरुवात आपल्याला करायची आहे. आयुष्यभराची जडणघडण आपल्याला शिकवते की, जरी माणसं बदलतात, परिस्थिती बदलते, तरीही आपल्या आतली शक्ती आणि धैर्य आपल्याला पुढे घेऊन जात असते. आजचे दुःख हे उद्या पुन्हा आपल्याला दिसणार नाही. म्हणून या नवीन वर्षात, गेल्या वर्षभरात कळत-नकळत गमावलेला आत्मविश्वास, हरवलेली आशा परत मिळवायला हवी. जीवनात जेव्हा अंधार गडद होतो, तेव्हा तोच अंधार आपल्याला प्रकाशाच्या दिशेने घेऊन जातो. कदाचित आयुष्यातील प्रत्येक क्षण आपल्याला दिलासा देणारं नसतं, पण त्या क्षणांमधूनच आपली खरी ओळख, आपला खरे सामर्थ्य उभे राहते. या नवीन वर्षात, स्वतःला शोधा. हा प्रवास आपला आहे आणि प्रत्येक नव्या सुरुवातीने आपले सर्व जुने दुःख विसरण्याची आणि नव्या आनंदाने जगण्याची संधी दिली आहे. तेव्हा नवीन वर्ष, नवीन बदल, नवीन दिशा आपण आपली ठरवून घ्या.

**-सुरज दहागावकर, चंद्रपूर**

## बदलते तंत्रज्ञान

### आता व्हॉटस्‌अ‍ॅप तुमचा स्कॅनर! फॉलो करा 'या' सोप्या स्टेप्स

आजच्या घडीला स्मार्टफोन दैनंदिन जीवनातील एक महत्त्वाचा भाग ठरला आहे. नोकरीवर रुजू होताना किंवा एखाद्याला महत्त्वाची कागदपत्र (डॉक्युमेंट) तत्काळ पाठवायची असतील तर स्कॅन करून मगच पाठवावे लागतात. यासाठी स्मार्टफोनमधील अनेक प्स आपल्याला उपयोगी पडतात, पण प्ले स्टोअरवर हे अ‍ॅप्स सर्च करताच तुमच्यासमोर एक यादी दिसेल. मग या अ‍ॅपमधील नक्की कोणता योग्य आहे हे ठरवण्यात आपल्या सगळ्यांचीच तारांबळ उडते, पण आता तुम्हाला चिंता करण्याची गरज नाही, कारण व्हॉट्सअ‍ॅप तुमच्यासाठी एक खास गोष्ट घेऊन आला आहे.



होय, व्हॉट्सपने स्वतःचे स्कॅनर फीचर आणण्याची योजना आखली आहे. W-BetaInforच्या मते मेसेजिंग प्लॅटफॉर्म आपल्या नवीन फीचर्ससह डॉक्युमेंट स्कॅन करणे सोपे करणार आहे. व्हॉट्सअ‍ॅप तुमचा अनुभव कसा बदलणार आहे ते पाहू या.

नवीन फीचर तुम्हाला अ‍ॅपमध्ये थेट कागदपत्रे स्कॅन करण्यास अनुमती देईल. सध्या हे नवीन फीचर काही युजर्ससाठीच उपलब्ध आहे आणि तुम्हाला हे iOS अपडेटसाठी नवीन व्हर्जन (आवृत्ती २४.२५.८०)मध्ये सापडेल. व्हॉट्सपमध्ये मिळणाऱ्या नेहमीच्या शेअरिंग पर्यायामध्ये हे फीचर जोडले जाईल.

या फीचरचा उपयोग कसा करायचा?

१. सगळ्यात पहिले व्हॉट्सप उघडा.

२. आता डॉक्युमेंट शेअरिंग पर्याय निवडा.

३. पुढे तुम्हाला 'कॅमेरा' पर्याय निवडावा लागेल.

४. कॅमेरा उघडल्यानंतर तुम्हाला स्कॅनचा पर्याय दिसेल.

५. आता डॉक्युमेंट स्कॅन करा आणि तुम्हाला पाहिजे तसे ॲड्जेस्ट करा.

६. डॉक्युमेंट एडिट करून झाल्यानंतर तुम्ही तो थेट चॅट किंवा ग्रुपवर पाठवू शकता.

ही बाब पण लक्षात ठेवा की, हे फीचर डॉक्युमेंट कसे आणि कुठून क्रॉप करावे यासाठीदेखील सूचना देईल. या व्यतिरिक्त तुम्हाला कॉन्ट्रास्ट आणि ब्राईटनेससुद्धा अ‍ॅड्जेस्ट करण्यात मदत करेल.

# भारतीय शास्त्रज्ञ सत्येंद्रनाथ बोस

भारतीय शास्त्रज्ञ सत्येंद्रनाथ बोस हे सैद्धांतिक भौतिकशास्त्रात तज्ज्ञ असलेले भारतीय गणितज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ होते. बोस सांख्यिकी आणि बोस कंडेन्सेटच्या सिद्धांताचा पाया विकसित करण्यासाठी १९२०च्या सुरुवातीच्या काळात क्वांटम मेकॅनिक्सवर केलेल्या कामासाठी ते प्रसिद्ध आहेत. आज त्यांच्या जन्मदिवशी कार्याचा घेतलेला धांडोळा...



बोस-आइन्स्टाईन जोडीतील विश्वविख्यात शास्त्रज्ञ सत्येंद्रनाथ यांचा जन्म १ जानेवारी १८९४ रोजी कोलकाता येथे झाला. त्यांचे वडील सुरेंद्रनाथ हे रेल्वेत नोकरीला होते. बोस यांचा जन्म कलकत्ता येथे झाला. ते बंगाली कायस्थ कुटुंबातील सात मुलांपैकी सर्वात मोठे होते. त्यांचे शालेय शिक्षण वयाच्या पाचव्या वर्षी त्यांच्या घराजवळ सुरू झाले. जेव्हा त्यांचे कुटुंब गोबागन येथे गेले तेव्हा त्यांना न्यू इंडियन स्कूलमध्ये दाखल करण्यात आले. शाळेच्या शेवटच्या वर्षात त्याला हिंदू शाळेत प्रवेश मिळाला. १९०९मध्ये त्यांनी प्रवेश परीक्षा (मॅट्रिक) उत्तीर्ण केली. पुढे ते प्रेसिडेन्सी कॉलेज, कलकत्ता येथे इंटरमिजिएट सायन्स कोर्समध्ये सामील झाले, जिथे त्यांच्या शिक्षकांमध्ये जगदीश चंद्र बोस, शारदा प्रसन्न दास आणि प्रफुल्ल चंद्र रे यांचा समावेश होता.

**निमित्त**

बोस यांना प्रेसिडेन्सी कॉलेजमधून मिश्र गणित विषयात विज्ञान पदवी प्राप्त झाली. १९१३मध्ये ते प्रथम आले. त्यानंतर त्यांनी आशुतोष मुखर्जी यांच्या नव्याने स्थापन झालेल्या विज्ञान महाविद्यालयात प्रवेश घेतला. जिथे ते पुन्हा १९१५मध्ये एमएससी मिश्रित गणिताच्या परीक्षेत प्रथम आले. एमएससी पूर्ण केल्यानंतर बोस १९१६मध्ये कोलकाता विद्यापीठाच्या सायन्स कॉलेजमध्ये रिसर्च स्कॉलर म्हणून रुजू झाले आणि त्यांनी सापेक्षतेच्या सिद्धांतावर अभ्यास सुरू केला.

बोस यांनी साहा यांच्यासमवेत १९१८पासून सैद्धांतिक भौतिकशास्त्र आणि शुद्ध गणितामध्ये अनेक पेपर्स सादर केले. १९२४मध्ये ढाका विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात वाचक म्हणून काम करत असताना, बोस यांनी शास्त्रीय भौतिकशास्त्राचा कोणताही संदर्भ न घेता प्लँकच्या क्वांटम रेडिएशन कायद्याची व्युत्पन्न करणारा एक शोधनिबंध लिहिला. क्वांटम स्टॅटिस्टिक्सचे महत्त्वाचे क्षेत्र तयार करण्यात हा पेपर महत्त्वाचा होता. प्रकाशनासाठी लगेच स्वीकारले नसले तरी त्यांनी तो लेख थेट अल्बर्ट आइनस्टाईन यांना पाठवला. आइन्स्टाईनने पेपरचे महत्त्व ओळखून स्वतः जर्मन भाषेत भाषांतर केले व बोस यांच्या वतीने प्रतिष्ठित Zeitschrift fr Physik यांना सादर केले. या ओळखीचा परिणाम म्हणून, बोस युरोपियन क्ष-किरण आणि क्रिस्टलोग्राफी प्रयोगशाळांमध्ये दोन वर्षे काम करू शकले, ज्या दरम्यान त्यांनी लुईस डी ब्रोग्ली, मेरी क्युरी व आइन्स्टाईन यांच्यासोबत काम केले. पुढे सत्येंद्रनाथांना भारत सरकारने पद्मविभूषण पुरस्कार देऊन गौरविले. ४ फेब्रुवारी १९७४ रोजी त्यांचे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### वायू प्रदुषणामध्ये तुमच्या डोळ्यांची अशी घ्या काळजी

वायू प्रदूषण ही केवळ आपल्या फुफ्फुसांसाठीच नाही, तर आपल्या डोळ्यांसाठीही एक गंभीर समस्या आहे. प्रदूषणात वाहने, कारखाने आणि इंटेरिअर यांमधून होणाऱ्या उत्सर्जनाचा समावेश होतो, ज्यामुळे डोळ्यांशी संबंधित अनेक समस्या उद्‌भवू शकतात, असे डॉ. अंकिता सबरवाल, एमएस (ऑप्थॅल्मोलॉजी), सीनियर कन्सल्टंट, श्रीजीवन हॉस्पिटल, न्यू दिल्ली यांनी सांगितले.



डोळ्यांमध्ये कोरडेपणा, लालसरपण व खाज येणे ही सामान्य समस्या असते आणि जास्त गंभीर समस्यांमध्ये कंजक्टिवायटिस, ग्लुकोमा, कॅटॅरॅक्ट आणि वयाशी संबंधित समस्यांमध्ये मॅक्युलर डीजनेरेशन (एएमडी) यांचा समावेशआहे. जास्त धुक्याच्या वातावरणात, जसं की हिवाळ्यात, डोळ्यांच्या आरोग्याचा धोका खूप वाढतो आणि त्यामुळे डोळ्यांसाठी अतिरिक्त काळजी घेणे आवश्यक आहे, असे डॉ. सबरवाल यांनी सांगितले.

डॉ. सबरवाल यांच्या मते, प्रदूषणामुळे डोळ्यांना त्रास होतो आणि सूज येते; ज्यामुळे खाज सुटणे, डोळ्यांतून पाणी येणे, पापण्यांजवळ सूज येणे व दृष्टिदोष यांसारख्या समस्या उद्भवतात. या प्रदूषणाचा ठिकाणी दीर्घकाळ संपर्क झाल्याने डोळ्यांच्या संवेदनशील भागांचे नुकसान होते, ज्यामुळे दृष्टी कायमची कमजोर होऊ शकते.

दीर्घकाळ प्रदूषणाच्या ठिकाणी जाऊ नका. प्रदूषणाच्या हानिकारक कणांपासून डोळ्यांचे संरक्षण करणारे गॉगल्स किंवा सनग्लासेस घाला. स्वच्छतेबाबत काळजी घ्या. हात वारंवार धुवा आणि प्रदूषणाचा डोळ्यांशी थेट संपर्क येऊ देऊ नका.

जर तुम्हाला लालसरपणा, खाज सुटणे किंवा धूसर दिसणे यापैकी कोणतीही समस्या जाणवत असेल, तर डोळ्याच्या तज्ज्ञांचा सल्ला घ्या. स्वतः उपचार करण्याचा प्रयत्न करू नका, कारण चुकीच्या उपचारामुळे स्थिती आणखी वाईट होऊ शकते, असे डॉ. सबरवाल यांनी सांगितले.

जर तुम्हाला खाज, कोरडेपणा किंवा लालसरपणाचा त्रास होत असेल, तर डोळे चोळू नका, असे कॉर्निया, कॅटॅरॅक्ट व रिफ्रॅक्टिव सर्जन, हिरानंदानी हॉस्पिटल, वाशी-ए फोर्टिस नेटवर्क हॉस्पिटल येथील डॉ. हर्षवर्धन घोरपडे यांनी स्पष्ट केले. त्याऐवजी आयड्रॉप्स वापरा आणि जर डोळ्यांमध्ये संसर्ग झाल्याचा संशय असेल, तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# पनवेल महानगरपालिका

## ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

### जाहिर प्रकटन

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरीकांना सूचित करणेत येते की, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. १५५/२०११ मध्ये वेळोवेळी दिलेल्या आदेशात सार्वजनकि/ खाजगी जागेवर, इमारतींवर लावण्यात आलेले अनधिकृत जाहिरात, होर्डिंग्ज, फ्लेक्स, बॅनर, फलक इ. वर तातडीने कारवाई करणेचे आदेश दिलेले आहेत. तरी सर्व नागरीक/ संस्था/ मंडळ/ राजकिय पक्ष इ. सुचित करणेत येते कि, शहरामध्ये विनापरवानगी लावणेत आलेले जाहिरात, होर्डिंग्ज, फ्लेक्स, बॅनर, फलक इ. तसेच भिंती रंगवुन जाहिरात करु नयेत. तसेच झाडावर कोणत्याही प्रकारची जाहिराती लावुन इजा पोहचू नये. अन्यथा संबंधितांवर सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध कायद्याअंतर्गत फौजदारी कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये विनापरवानगी जाहिरात, होर्डिंग्ज, फ्लेक्स, बॅनर, फलक इ. लावलेचे आढळल्यास त्याची माहिती देणेकरीता नागरीकांना नावंनिशी किंवा निनावी तक्रार नोंदविण्याकरीता पनवेल महानगरपालिकेने खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

**टोल फ्री क्रमांक :- १८००-२२७-७०१**
**ई- मेल :- panvelcorporation@gmail.com**
**व्हॉट्सॲप क्रमांक व एस.एम.एस. सुविधा :- ९७६९०१२०१२**
**दूरध्वनी क्रमांक :- ०२२- ७४५८०४०/४१/४२**

नागरीकांनी आपल्या क्षेत्रात/ परिसरात कोणत्याही प्रकारचे अनधिकृत होर्डिंग्ज लावलेले आढळल्यास अथवा नव्याने लावले जात असल्याचे निदर्शनास आल्यास वरील क्रमांकावर तक्रार नोंदविता येईल.

अधिक माहितीसाठी संबंधित प्रभागाचे नोडल अधिकारी तथा प्रभाग क्षेत्र अधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे

| अ.क्र. | प्रभाग अधिकाऱ्यांचे नाव | प्रभाग समिती | भ्रमणध्वनी क्रमांक | प्रभाग क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीम. स्मिता काळे, | खारघर अ-१ नावडे अ -२ | ९३०९८७४०७७ | आडिवली, बीड, रोहिंजण, धानसर, तुर्भे, पिसार्वे, करवले बु., तळोजे मजकुर, पेंधर, घोट, कोयनावेळे, नावडे, पडघे, तोंडरे, पालेखुर्द, देवीचा पाडा, चाळ, नागझरी, ओवे, तळोजे पाचनंद, खारघर, बेलपाडा गाव, हिरानंदनी, रेल्वे विहार, फणसवाडी, चाफेवाडी, हैदरवाडी, बेलपाडा, कातकरवाडी, कोपरा गाव, |
| २. | श्री. श्रीराम पवार | कळंबोली | ७८२०८८५९७१ | रोडपाली, कळंबोली, खिडुकपाडा, वळवली, टेंभोडे आसुडगाव, नवीन पनवेल, सेक्टर १,४,५,७ मधील काही भाग, सेक्टर- ८,९,१०,११,१२, मधील काही भाग, खांदा कॉलनी, काही भाग |
| ३. | श्री.सुबोध ठाणेकर | कामोठे | ८४५०९९२१२९ | कामोठे, कामोठे गाव, जूई गाव, कोळीवाडा, गाढी नदी परिसर, धाकटा खांदा, मोठा खांदा, पनवेल, मधील काही भाग, ठाणा नाका रोड, ५२ बंगला, साई नगर, बंदर रोड |
| ४. | श्रीम. रुपाली माने | पनवेल | ८१०८२३८३०३ | काळुंद्रे, तक्का, पनवेल, नवीन पनवेल काही भाग, पोदी से- १२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९ |

संबंधित प्रभागक्षेत्र अधिकारी यांनी २४ तासांत तक्रारीवर कारवाई न केल्यास त्यांची तक्रार खालील नियंत्रक अधिकाऱ्यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर करण्यात यावी.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम | भ्रमणध्वनी |
|---|---|---|---|
| १. | श्री. रविकिरण घोडके | उपायुक्त (अतिक्रमण निष्कसन विभाग) | ९१३७०८४००८ |
| २. | श्री. सुबोध ठाणेकर | सहा. आयुक्त (अतिक्रमण निष्कसन विभाग) | ८४५०९९२१२९ |
| ३. | श्री. सदाशिव कवठे | अधिक्षक (अतिक्रमण निष्कसन विभाग) | ९८१९६३३१७४ |

तसेच नागरीकांना याद्वारे आवाहन करणेत येत आहे की, सोबत प्रसिध्द करणेत आलेल्या प्रभागनियाह तात्पुरत्या स्वरुपामध्ये जाहिरात बॅनर लावणेकामी जागा निश्चित करणेत आलेल्या आहेत. तसेच सदर जागांची यादी यासोबत व महापालिकेच्या अधिकृत www.panvelcoporation.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे. सदर ठिकाणी महापालिकेने तात्पुरते बॅनर, फ्लेक्स करीता परवानगी दिली जाणार आहे. यादीनुसार निश्चित करणेत आलेल्या जागांव्यतिरीक्त अन्य सार्वजनकि/ खाजगी ठिकाणी जाहिरात बॅनर, फ्लेक्स लावणेत येऊ नये, अन्यथा नियमानुसार दंडात्मक कारवाई करणेत येईल.

जा.क्र. पमपा/ अ.बां.नि./ ३६२४/ प्र.क्र. ०३/ ९३१ /२०२५
दि. ३१ /१२/२०२५

सही/-
(मंगेश चितळे)
प्रशासक तथा आयुक्त
पनवेल महानगरपालिका

# पनवेल महानगरपालिका

## जाहिरात व आकाशचिन्ह विभाग

➢ जाहिरात बॅनर, फ्लेक्स लावणेकरीता प्रभाग निहाय निश्चित करणेत आलेल्या जागांची यादी

| अ.क्र. | बॅनर, फ्लेक्स लावणेचे ठिकाण | संख्या | वार्ड क्र. |
|---|---|---|---|
| | **प्रभाग समिती 'अ', खारघर** | | |
| १. | रोहिंजन गाव नाका | ०१ | ०१ |
| २. | टोलनाका, धरणा गाव | ०१ | ०१ |
| ३. | खुटारी गाव, सर्विस सेंटर जवळ, खुटारी | ०१ | ०१ |
| ४. | कोयनावेळे गाव कमानी | ०१ | ०१ |
| ५. | कोयानावेळे गाव रिक्षा स्टॅंड | ०१ | ०१ |
| ६. | घोटगाव ब्रिज जवळ | ०१ | ०१ |
| ७. | पेंधर गाव कमानी (MIDC) | ०१ | ०१ |
| ८. | घोटगाव कमान (MIDC) | ०१ | ०१ |
| ९. | नितलस फाटा (MIDC) | ०१ | ०१ |
| १०. | नावडे गाव कमानी | ०१ | ०२ |
| ११. | भावेश वेअरहौसींग जवळ, नावडे कॉलनी, फेज- २ | ०१ | ०२ |
| १२. | नावडे तळोजा ब्रिज, पी.जे. म्हात्रे स्कुल जवळ | ०१ | ०२ |
| १३. | नावडे (MIDC) बॅंक ऑफ इंडिया समोर | ०१ | ०२ |
| १४. | बेलनाका (MIDC) पोलीस चौकी समोर | ०१ | ०२ |
| १५. | देविचा पाडा स्मशानभुमी समोर, कमानी जवळ | ०१ | ०२ |
| १६. | अरिहंत अमिशा सोसायटी रोड, तलावाजवळ, पालेखुर्द | ०१ | ०२ |
| १७. | तोंडरे गाव टेम्पो नाका जवळ | ०१ | ०२ |
| १८. | तोंडरे गाव पाण्याची टाकी गेटजवळ | ०१ | ०२ |
| १९. | डोंगऱ्याचा पाडा गाव कमानीजवळ | ०१ | ०२ |
| २०. | पेठाली गाव, कमानी जवळ | ०१ | ०३ |
| २१. | तळोजे मजकुर गाव कमानी जवळ | ०१ | ०१ |
| २२. | तळोजे फेज- १ पोलीस चौकी जवळ | ०१ | ०३ |
| २३. | तळोजे फेज- १ अंडरपास प्रवेशद्वाराजवळ | ०१ | ०३ |
| २४. | पापडीचा पाडा गाव नाका | ०१ | ०३ |
| २५. | तळोजा फेज-१, RAF कॅम्प गेट समोर | ०१ | ०३ |
| २६. | पापडीचा पाडा, साई मन्नत सर्कल | ०१ | ०३ |
| २७. | ओवेगाव नाका | ०१ | ०३ |
| २८. | ओवेकॅम्प नाका | ०१ | ०३ |
| २९. | खुटुक बांधन गाव नाका कमानीजवळ | ०१ | ०३ |
| ३०. | सेक्टर- ३५, बॅंक ऑफ इंडिया समोरील ब्रिजखाली, खारघर | ०१ | ०३ |
| ३१. | पेठ गाव, मेट्रो स्टेशन समोर डाव्या बाजुस, खारघर | ०१ | ०३ |
| ३२. | रांजणपाडा गाव नाका | ०१ | ०३ |
| ३३. | खारघर गाव प्रवेश मार्ग तलावा जवळ | ०१ | ०४ |
| ३४. | डेलीबाजार समोर , खारघर | ०१ | ०४ |
| ३५. | पेठ गाव मेट्रो स्टेशनच्या उजव्या बाजुला, शिल्प चौक, खारघर | ०१ | ०४ |
| ३६. | ग्राम विकास भवन समोर, खारघर | ०१ | ०४ |
| ३७. | सेंट्रल पार्क रोडच्या डाव्या बाजुस, खारघर | ०१ | ०४ |
| ३८. | निळकंठ शॉप समोर, सेक्टर- १०, खारघर | ०१ | ०४ |
| ३९. | रामशेठ स्कुल रोडच्या डाव्या बाजुस, सेक्टर- १९, खारघर | ०१ | ०४ |
| ४०. | मुर्बी गाव, चिंचेचे झाडाजवळ खारघर | ०१ | ०४ |
| ४१. | सेक्टर- ११, भाजी मार्केट समोर, खारघर | ०१ | ०५ |
| ४२. | गणेश मंदीर, सेक्टर- १०, समोर, कोपरा, खारघर | ०१ | ०५ |
| ४३. | सिडको गार्डन समोर, सेक्टर- १०, कोपरा | ०१ | ०५ |
| ४४. | नवरंग रोड, सेक्टर- १२, झामा स्विट समोर | ०१ | ०५ |
| ४५. | बेलपाडा टॅक्सी स्टॅंड समोर, डाव्या बाजुस | ०१ | ०५ |
| ४६. | बेलपाडा टॅक्सी स्टॅंड समोर, उजव्या बाजुस | ०१ | ०५ |
| ४७. | सेक्टर- १२, गणपती मंदीर समोर, खारघर | ०१ | ०५ |
| ४८. | बेलपाडा रोड, सेक्टर- ४, YMT Dental कॉलेज जवळ | ०१ | ०५ |
| ४९. | सेक्टर- ०३, येरला मेडिकल जवळ | ०१ | ०५ |
| ५०. | सेक्टर- १२ साईबाबा मंदीर समोर, खारघर | ०१ | ०५ |
| ५१. | शाह आर्केड बिल्डिंग समोर, सेक्टर- ०६, खारघर | ०१ | ०५ |
| ५२. | सेक्टर- ०६, ड्रायविंग रेंज रोड जवळ | ०१ | ०५ |
| ५३. | मंकी पॉंईट, डाव्या बाजुस खारघर | ०१ | ०६ |
| ५४. | मंकी पॉंईट, उजव्या बाजुस खारघर | ०१ | ०६ |
| ५५. | APJ अब्दुल कलाम रोड कॉर्नर, सेक्टर- १२, खारघर | ०१ | ०६ |
| ५६. | सेक्टर- १०, बॅंक ऑफ इंडिया समोर, खारघर | ०१ | ०६ |
| ५७. | हायवे ब्रेक हॉटेलच्या उजव्या बाजुस, सेक्टर-१०, खारघर | ०१ | ०६ |
| ५८. | सेक्टर- १५ स्वर्गगंगा ज्वेलर्स समोर, खारघर | ०१ | ०६ |
| ५९. | पेंधर टेम्पो नाका, महानगरप गॅस समोर, पेंधर | ०१ | ०६ |
| ६१. | पेंधर गाव कमानीजवळ | ०१ | ०६ |
| ६२. | तळोजा पोलीस स्टेशन रोड, बस स्टॉप समोर, तळोजा | ०१ | ०६ |
| ६३. | हॉटेल हायवे ब्रेक जवळ समोरच्या बाजुस, खारघर | ०१ | ०६ |
| ६४. | घरकुल स्पॅगेटी गेट समोर, खारघर | ०१ | ०६ |
| ६५. | विबग्योर स्कुल रोड कॉर्नर, सेक्टर- १५, खारघर | ०१ | ०५ |
| | **प्रभाग समिती 'ब', कळंबोली** | | |
| १. | कळंबोली मुख्य प्रवेश, शिवसेना शाखा ऑफिसच्या बाजूला, कंळबोली | ०१ | १० |
| २. | सुधागड हायस्कुल समोर, डाव्या बाजुस, सेक्टर ०१ ई, कळंबोली | ०१ | १० |
| ३. | सुधागड हायस्कुल समोर, उजव्या बाजुस,सेक्टर ०१ ई, कळंबोली | ०१ | १० |
| ४. | भारत गॅस समोर, गार्डन सेक्टर- १, कळंबोली | ०१ | १० |
| ५. | लेबर नाका, पोलीस निवारा गार्डन जवळ, कळंबोली | ०१ | ०९ |
| ६. | लेबर नाका, गार्डन जवळ, कळंबोली | ०१ | ०९ |
| ७. | जनता मार्केट जवळ, सेक्टर- ५, कळंबोली | ०१ | ०८ |
| ८. | समाज मंदीर जवळ, सेक्टर- ५, कळंबोली | ०१ | ०८ |
| ९. | हिंदुस्थान बॅंकेच्या जवळ, सेक्टर- १० ए, कळंबोली | ०१ | ०८ |
| १०. | आय.डी.बी.आय बॅंकेजवळ, सेक्टर- ०५ ई, कळंबोली | ०१ | ०८ |
| ११. | सिडको मार्केट जवळ, सेक्टर- ०५ ई, कळंबोली | ०१ | ०८ |
| १२. | सेक्टर- ९ ई, रिक्षा स्टॅंड जवळ, कळंबोली | ०१ | ०८ |
| १३. | डि मार्ट जवळ, सेक्टर- १४, कळंबोली | ०१ | ०७ |
| १४. | कळंबोली सर्कल, एमजीएम हॉस्पिटल जवळ, कळंबोली | ०१ | १० |
| १५. | पुरुषार्थ पेट्रोल पंप (तलोजा लिंक रोड) कळंबोली | ०१ | ०७ |
| १६. | स्टील मार्केट बीम कॉम्प्लेक्स जवळ, कळंबोली | ०१ | ०९ |
| १७. | खिडुकपाडा गावाच्या कमानी जवळ | ०१ | ०९ |
| १८. | खिडुकपाडा वाळदेश्वर मंदीर जवळ | ०१ | ०९ |
| १९. | फुडलॅंडसमोर सिग्नलच्या दोन्ही बाजूस तलोजा, पनवेल हायवे | ०१ | ०९ |
| २०. | SBI बॅंकेसमोर रोडपाली, कळंबोली | ०१ | ०७ |

(पान ७ वर..)

# सिडकोने शिवसृष्टी उभारावी -लोकनेते रामशेठ ठाकूर

## दि.बा. पाटीलसाहेबांची नामकरण चळवळ जिवंत ठेवणेही गरजेचे

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या वाशीगाव येथील जनसंपर्क कार्यालयात सोमवारी (दि.३०) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीत त्यांनी शिवसृष्टीचा देखावा सिडकोने उभारावा, अशी मागणी व्यक्त केली. यासोबतच आगामी १३ जानेवारी रोजी लोकनेते दि. बा. पाटील यांची जयंती आहे. 'दिबां'ची नामकरण चळवळ ही जिवंत ठेवणे हे आपले आद्य कर्तव्य असल्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले.



तसेच सिडकोला आळा घालणे गरजेचे असून, नवी मुंबईतील पनवेल, उरण व ठाणे तालुक्यात भूमिपुत्र यांचे पुनर्वसन तसेच ग्रामीण आणि शहरी नागरिकांच्या सोई सुविधांचे आरक्षित भूखंड घेणे. नवपिढीला आपल्या शौर्यमय प्रेरणादायी इतिहासाचे स्मरण व्हावे म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचे शिल्प आणि राजदरबार असा शिवसृष्टीचा देखावा सिडकोने उभारावा, केवळ येथेच निर्माण न करता सिडकोने ठाणे, पनवेल तालुक्यातील सिडकोकृत शहरांतही असेच शिवसृष्टी उभारावी अशी इच्छा माजी खा. ठाकूर यांनी व्यक्त केली.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या या भेटीचे स्वागत करून त्यांस प्रभागातील कॅलेंडर स्वरूपी कार्यअहवाल भेट देण्यात आला. या वेळी सामाजिक कार्यकर्ते संदीप भगत आणि वाशीगाव ग्रामस्थ उपस्थित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दि.बा. पाटील नामकरण आंदोलनात भरीव सहभाग घेऊन आंदोलनाला उत्तम दिशा दिल्याबद्दल वाशीगाव ग्रामस्थांचे स्तुती केली. तसेच सदर चर्चेत त्यांनी सिडको आणि एमआयडीसी तसेच वन विभाग या राज्य सरकारच्या संस्थांची स्तुतीही केली. प्रकल्पग्रस्तांचे विविध प्रलंबित प्रश्नांपैकी ज्या प्रश्नांबाबत सरकारने धोरणत्मक निर्णय घेतले आहेत त्यांची अंमलबजावणी करावी. सामाजिक सोई सुविधेचे भूखंड नाममात्र दरात ग्रामपंचायती व पालिका यांना हस्तांतरित करावेत. उलवे नोड येथीलगव्हाण कोपर रेल्वे स्टेशन शेजारील सामाजिक आरक्षित मैदान भूखंडावर उद्यान तयार करणे, तसेच १९८४ चा भूमी अधिग्रहण विरोधीचा रक्तरंजित लढ्याच्या इतिहासाचे स्मरण व लोकनेते दि. बा. पाटील यांच्यासह महाराष्ट्र आणि देशातील महान युगपुरुष यांची शिल्पे (स्मारके) सिडकोने उभारावीत किंवा गव्हाण -कोपर ग्रामपंचायत यांनी दिलेल्या ग्राम मागणी ठरावाप्रमाणे सदर भूखंड नाममात्र दराने ग्रामपंचायतीस हस्तांतरण करावे.

भूखंडावर उल्लेख केलेले विकास कार्य श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळामार्फत केले जाणार आहे, परंतु गेले २०१८ पासून ते आजपर्यंत केलेल्या पत्रव्यवहारावर सिडको प्रशासनाने लोकहिताच्या बाजूने निर्णय घेणे गरजेचे आहे. याबाबत राज्य सरकारने व रायगड जिल्हाधिकारी यांनी हस्तक्षेप करून नागरिकांच्या तीव्र भावना शमविण्यास पुढाकार घेतला पाहिजे, अशी ही अपेक्षा व्यक्त केली.

## ३२ टन सळ्यांचा ट्रेलर पळविणारी टोळी जेरबंद

**नवी मुंबई : बातमीदार**

शस्त्राच्या धाकाने लोखंडी सळयांनी भरलेला ट्रक पळविणाऱ्या यूपीच्या टोळीतील सात जणांना नेरूळ पोलिसांनी मुंबई, ठाण्यात मुद्देमालासह अटक केली. या आरोपींनी नेरूळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत सायन-पनवेल महार्गावर शस्त्राचा धाक दाखवून मूल चालकाला मारहाण केली आणि सुमारे ३२ टन लोखंडी सळयांनी भरलेला ट्रेलर पळविला होता. त्यापैकी २४ टन सळया जप्त करण्यात आल्या आहेत.

चालकाच्या तक्रारीवरून नेरूळ पोलिसांनी अज्ञात लुटारूंविरोधात गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याच्या तपासासाठी पोलीस उपायुक्त पंकज डहाणे, वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक नेमण्यात आले होते. तपासादरम्यान खबऱ्याने दिलेली माहिती आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे सहायक पोलीस निरीक्षक नीलेश शेवाळे, अमित शेलार व इतर पोलिसांनी शहारूख वकील अहमद (२२), नितेश अशोक कौशल (२०), सलाउद्दिन वलिमोहम्मद खान (२६), सबलू मनराज यादव (२१), मन्सुरअली मोहम्मद उमर चैधरी (३३), दिपेश चंद्रभान तिवारी (२८) आणि जावेद शफिक सैयद (२८) यांना अटक केली.

## बाजार समितीचे प्रश्न प्राधान्याने सोडवू -ना. रावल

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती ही आशियातील सर्वात मोठी बाजार समिती आहे. या बाजार समितीच्या माध्यमातून सर्वांनी एकत्र येवून आदर्श काम उभे करू या. यासाठी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने मार्गी लावले जातील, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी सोमवारी (दि.३०) केले.



राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, वाशी येथे आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. या वेळी माजी मंत्री तथा मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शशिकांत शिंदे, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक, उपसभापती धनंजय वाडकर, सचिव डॉ.पांडूरंग खंडागळे व सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.

मंत्री रावल पुढे म्हणाले की, सध्याच्या परिस्थितीत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे पुनर्विकासाचे काम प्रस्तावित आहे. याचे नियोजन करताना पुढील ५० वर्षांचे नियोजन करावे. हे काम टप्प्याटप्प्याने वेगाने पूर्ण केले जाईल. पुढील ४५ दिवसात या कृषी उत्पन्न बाजार समिती विषयीच्या विविध प्रश्नांबाबत ठोस निर्णय घेण्यात येतील. राज्य व केंद्र शासनाची मदत घेवून आशियातील सर्वात मोठी मार्केट कमिटी आहे, या लौकिकाला साजेसे काम करूया. जगातील इतर आघाडीच्या मार्केट कमिट्यांचा अभ्यास करावा. लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महोदयांकडे बैठकीसाठी वेळ मागितला जाईल व मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रलंबित विषयांबाबत सविस्तर चर्चा व उपाययोजनांसंबंधीचे नियोजन करण्यात येईल. येत्या काळात सद्य:स्थितीत असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अख्यत्यारीतील बाजारपेठांचे विभागनिहाय कृषी मेळावे घेणे प्रस्तावित आहे.

ते पुढे म्हणाले की, सर्व घटकांना एकत्र घेवून या कृषी उत्पन्न बाजार समितीचा विकास साधला जाईल. शेतकऱ्यांसाठी आणि व्यापाऱ्यांसाठी सकारात्मक निर्णय घेतले जातील. शेतकऱ्यांच्या हितासाठी राजशिष्टाचार आणि पणन विभागाचा मंत्री या नात्याने या दोन्ही विभागांची सांगड घालून शेतकऱ्यांसाठी काही उपयुक्त निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल. लोकांसमोर आपल्याला आदर्श काम ठेवावेच लागेल. शेतकरी आणि व्यापाऱ्यांसाठी आवश्यक त्या सोयीसुविधा उभारल्या जातील.

या बैठकीनंतर पणन मंत्री रावल यांनी प्रसारमाध्यमांशीही संवाद साधला. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचा परिसर आणि कृषी व पणन मंडळाच्या निर्यात सुविधा प्रकल्पांची पाहणी केली. बैठकीच्या सुरुवातीस पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्यासमोर मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव डॉ.पांडूरंग खंडागळे आणि मुख्य वित्त व लेखा अधिकारी मंदार साळवी यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे कामकाज तसेच प्रस्तावित बाबींची माहिती सादर केली.

माजी मंत्री तथा मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शशिकांत शिंदे यांनी बैठकीच्या प्रास्ताविकात मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत मंत्र्यांचे लक्ष वेधले. या बैठकीच्या निमित्ताने संचालक मंडळातील काही संचालकांनी बाजार समितीचा पुनर्विकास, सध्याची कार्यपद्धती, भविष्यातील सुधारणा, अपेक्षित सोयीसुविधा याविषयी आपली मते मांडली. शेवटी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी मंत्र्यांचे आभार मानले.

## निवडक




### विजय शिरढोणकर यांना पुरस्कार

**नवी मुंबई :** पारस काव्य, कला, जनजागृती संस्था आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा २०२४ नवी मुंबई सानपाडा येथे झाला. या वेळी कला, साहित्य, संस्कृती, समाज, शिक्षण, पर्यावरण अशा विविध क्षेत्रात नेहमी कार्यरत असणारे व लोकनेते स्व. दि. बा. पाटील यांच्या सोबत समाज कार्य करणारे तरघर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विजय नामदेव शिरढोणकर यांना आगरी समाजभूषण पुरस्कार २०२४ने सन्मानित करण्यात आले. या वेळी संस्थापक अध्यक्ष मंगेश चांदिवडे, शोभा चांदिवडे, दामोदर बेडेकर तसेच अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्वामी समर्थ दर्शन सोहळा

**नवी मुंबई :** कै. अमर पाटील यांचे स्मरण करून नवी मुंबई युवा संस्थेच्या वतीने श्री स्वामी समर्थ दर्शन सोहळा अर्जुन चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली नेरुळ सेक्टर १० येथे झाला. या वेळी अध्यात्माबरोबर सामाजिक बांधिलकी जपत श्री स्वामी समर्थ भक्तांनी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ५० रक्तदातांनी रक्तदान करून स्वामी सेवा केली. प्रारंभी, सकाळी श्री स्वामी समर्थ महाराजाचा अभिषेक, पूजा, हवनयुक्त पारायण, नामजप विधिवत करण्यात आले. त्यानंतर पालखी सोहळ्यात नागरिक, भक्तगन आणि सेवेकरी भजन करीत मोठया संख्येने सहभागी झाले होते. या वेळी आयोजित महाप्रसादाचा लाभ ५,५०० भाविक भक्तांनी घेतला. दर्शन सोहळा यशस्वी करण्यासाठी स्वामी सेवेकरी, भक्तगण यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



### उत्तम तरकसे यांना पुरस्कार

**नवी मुंबई :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन सेक्टर १० सानपाडा नवी मुंबई येथील सभागृहात पारस काव्य कला जनजागृती संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय काव्य लेखन स्पर्धा, पारितोषिक व पुरस्कार वितरण सोहळा २०२४ मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला होता. कार्यक्रमास कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक पुंडलिक म्हात्रे, साहित्यिक डॉ. संजय बर्वे, सिंधू बांडे, दामोदर बेडेकर, मंगेश चांदिवडे, शोभा चांदवडे असे मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास नवी मुंबई पोलीस दलातील अधिकारी व कवी उत्तमराव तरकसे यांना कल्पक संघटक पुरस्कार २०२४ या मानाच्या राज्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



## महिलांनी घेतले एकवीरा देवीचे दर्शन

### आमदार मंदा म्हात्रेंच्या माध्यमातून उपक्रम



**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

आमदार मंदा म्हात्रे यांच्या माध्यमातून महिलांसाठी कार्ला येथील एकवीरा देवीच्या दर्शनाची सहल आयोजित करण्यात आली होती. यावेळी शेकोड महिलांनी हजेरी लावत देवीचे दर्शन घेतले.


भक्तिगीताच्या बोलाप्रमाणेच नवसाला पावणारी, कोळ्यांचे आराध्य दैवत असणारी देवी म्हणून एकवीरा देवीला हिंदू समाजात महत्वाचं स्थान आहे. एकवीरा देवीचे मंदिर लोणावळ्याच्या कार्ला लेण्यांच्या बाजूलाच आहे. मंदिराचे वेगळेपण लेण्यांमध्ये असलेले तिचे स्थान, प्राचीनता आणि तिचे लोभसवाणे रूप यामुळे या देवीचे महत्त्व काही वेगळेच आहे. याच अनुषंगाने २९ डिसेंबर २०२४ रोजी बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या माध्यमातून हजारो महिला भाविक भक्तांची एकवीरा देवीचे दर्शन मोफत सहल आयोजित करून शेकडो मतदारांना दर्शन घडले.

सहलीसाठी कोणतीही जाहिरात न करता हजारो महिलांनी आपल्याकडे नावनोंदणी केली, मात्र एवढ्या मोठ्या संख्येने बसची व इतर व्यवस्था करणे शक्य नसल्याने उर्वरित मतदारांना विभागनिहाय टप्प्याटप्प्याने एकवीरा आईचे दर्शन घडवणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत माजी नगरसेविका अनिता शेट्टी, जयश्री चित्रे, मनीष बिजलानी तसेच शेकडो असंख्य महिला भगिनी व नागरिक उपस्थित होते.



## क्लिक...क्लिक...!



**मुरूड : वर्षाअखेरचा सूर्योदय साक्षी ठेवून योगासने करणारा पर्यटक टिपला आहे सुधीर नाझरे यांनी.**













# थर्टीफर्स्टला खवय्यांनी मारला मासळीवर ताव

## ◆ पालीत खरेदीसाठी उसळी होती खवय्यांची झुंबड

**पाली : प्रतिनिधी**

थर्टीफर्स्ट अर्थात सरत्या वर्षाला निरोप देण्यानिमित्त व नववर्षाचे स्वागत करण्यासाठी पाली-सुधागडसह रायगड जिल्ह्यात पर्यटकांची मोठी रेलचेल आहे. जिल्ह्यात सध्या समुद्रातील मासेमारी जोरात सुरू आहे. येथे येणारे पर्यटक खाऱ्या पाण्यातील माशांना पसंती देत आहेत. त्यामुळे मासळीचे भावदेखील वधारले. तरीही थर्टीफर्स्टसाठी अनेकांनी आगाऊ बुकिंग करून खरेदी केली व ताज्या मासळीचा बेत करून ताव मारला.

रायगड जिल्ह्याला तब्बल २४० किमी लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. त्यामुळे येथे समुद्रातील ताजी मासळी सहज उपलब्ध होते. नाताळ सुट्टीत पर्यटकांची येथे मोठी गर्दी आहे. त्यांनी ताज्या मासळीचा बेत केला.

**नाताळ सुट्यांमुळे सध्या पर्यटक मोठ्या प्रमाणात दाखल होत आहेत तसेच सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी त्यांचा कल मासळी खाण्यावर अधिक दिसून आला. मासळीदेखील मुबलक व ताजी भेटत असल्याने खवय्ये खुश आहेत. परिणामी विक्रीसुद्धा चांगली होत आहे. थर्टीफर्स्टसाठी अनेकांनी आगाऊ बुकिंग केली होती.**
**गौरी मनोरे**, मासळी विक्रेत्या, पाली सुधागड

**नाताळ सुट्यांमध्ये व नवीन वर्षाच्या स्वागतासाठी, समुद्रकिनारी व इतरत्र फिरण्यासाठी सहकुटुंब लोक आले आहेत. बहुतांश जणांनी मासळी खाण्याला पसंती दिली.**
**मनीष पाटील**, चालक, माऊ रेस्टॉरंट,



### *फार्महाऊस व कॉटेजवरही मागणी*

*रायगड जिल्ह्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणात फार्महाऊस आहेत. नाताळच्या सुट्ट्यांमुळे हे फार्महाऊस मालक मुंबई, पुणे आदी शहरातून आपल्या फार्महाऊसवर मित्रमंडळी किंवा कुटुंबासमवेत दाखल झाले. येथे अनेक कॉटेजेस देखील आहेत आणि या ठिकाणीही पर्यटक येऊन विसावले. त्यामुळे येथे मासळीला अधिक मागणी असून नियमित मासळीवर ताव मारला जात आहे.*

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर रसायनच्या ट्रकचा अपघात

### उग्र वास आणि धुराच्या लोटाने प्रवासी गुदमरले



**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बोरघाटातील ढेकू गावच्या हद्दीत खोपोली बायपासजवळ शिवकृपा ट्रान्सपोर्ट वापी गुजरात या हायड्रोक्लोरीक रसायनवाहक ट्रकला अपघात झाला. त्यातून पडलेले काही ड्रम लिकेज होऊन केमिकलची गळती झाल्याने एक्स्प्रेस वेवर काही काळ उग्र दर्प पसरला होता. त्याचा तेथून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना त्रास झाला.

टीएन ५२ जे ७४४८ या क्रमांकाचा ट्रक हायड्रोक्लोरीक एचसीएल हे केमिकल घेऊन चेन्नई येथून मुंबईकडे जात होता. हा ट्रक मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खोपोली बायपासच्या जवळ नवीन बोगद्याच्या शेवटी अज्ञात वाहनाला मागून धडकला. या अपघातात ट्रकमधील केमिकलने भरलेले ड्रम मार्गावर पसरले, तर काही ड्रम फुटून केमिकल मार्गावर पसरले. काही ड्रम दरीतही कोसळले. या केमिकलचा उग्र दर्प व धुराच्या लोटाने वाहनचालक तसेच प्रवासी यांच्यामध्ये घबराटीचे वातावरण पसरले.

खोपोली पोलीस व खोपोली अग्निशमन दलाच्या जवानांनी यावर पाण्याचा फवारा मारून धुरावर नियंत्रण मिळवले. केमिकलचा वासही पाण्याच्या माऱ्याने आटोक्यात आणण्यात यश आले. वेळीच उपाययोजना केल्याने वायुगळती व धुराचे लोट तसेच केमिकल गळतीचा जास्त परिणाम झाला नाही. अपघातग्रस्त ट्रक सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आला व वाहतूक खुली करण्यात आली. या घटनेने अर्धा तास वाहतूक मात्र खोळंबली होती.

# नववर्ष स्वागतासाठी पेणमध्ये पोलिसांचे ऑपरेशन ऑल आउट

**पेण : प्रतिनिधी**

३१ डिसेंबर व नववर्ष स्वागत अनुषंगाने पेण पोलीस ठाणे हद्दीत महत्वाचे ठिकाणी ऑपरेशन ऑल आउट अंतर्गत मोहीम राबविण्यात आली.

या वेळी पेण उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोंपे यांच्या मार्गदर्शनाखाली व पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या नेतृत्वाखाली बोरगाव, खोपोली बायपास, नगरपालिका नाका, जुना पेट्रोल पंप अशा चार ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली. या वेळी वाहनांची तपासणी तसेच दारूबंदी अंतर्गत कारवाई करण्यात आल्या.

तसेच पेण पोलीस ठाणे हद्दीतील फार्म हाऊस, हॉटेल यांची स्वतंत्र पथक नेमून तपासणी करण्यात आली. तसेच दिवसभरात शहरात व इतर ठिकाणी पेट्रोलिंग



पथकाच्या माध्यमातून तपासणी करण्यात आली.

सोमवार रात्री ११ ते पहाटे ३ दरम्यान ऑपरेशन ऑल आउट अंतर्गत केलेल्या कारवाईत दारूबंदी अंतर्गत एक गुन्हा दाखल करून ५१ हजर ६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मोटार वाहन कायदा अंतर्गत तीन केसेस, तसेच चारचाकी दुचाकी वाहनांची तपासणी करण्यात आली.

## To Whomsoever It May Concern

I had given a Public Notice in News Paper daily Dainik Ramprahar" dated 1/1/2025 for and on behalf of MR. AMEY VINAYAK KASTURE, inviting information in respect of the lost document Agreement for Sale, dated 07/01/2015 vide document No. PVL 2 235/ 2015, concerning FLAT NO. C-201, SECOND FLOOR, C WING, FORTUNE HARMONY, SURVEY NO. 01, HISSA NO. 7A, KOPROLI, TALUKA PANVEL, DIST. RAIGAD.

I hereby certify that I have not received any information in regard to the lost documents Page No. 1 to 35, Receipt and Index 2, dated 07/01/2015, concerning FLAT NO. C-201, SECOND FLOOR, C WING, FORTUNE HARMONY, SURVEY NO. 01, HISSA NO. 7A, KOPROLI, TALUKA PANVEL, DIST. RAIGAD, specifically mentioned in the public notice till date.

Date : 1/1/2025

**sd/-**
**Jaywant Eknath Bhopi.**
**Advocate-Panvel**

## "नोटीस"

विषयः- **उशिरा मृत्यू नोंद करणेबाबत.**

संदर्भ :-अर्जदार श्री. श्री. संजय चंद्रकात सावंत रा. कामोठे, नवी मुंबई. ता.पनवेल, जि.रायगड यांचा दि. ०३/०९/२०२४ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. संजय चंद्रकांत सावंत, रा. कामोठे, नवी मुंबई. ता.पनवेल, जि.रायगड यांनी कै. चंद्रकांत रामचंद्र सावंत यांची उशिरा मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेकामी कार्यकारी दंडाधिकारी ता. पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर मृत्यू नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काहीएक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(संजय भालेराव)**
प्र. निवासी नायब तहसलिदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी पनवेल

पत्र.क्र.मशा/प्रशा-१/ उशिरा मृत्यू नोंद नोटीस/२०२४/१९७/२०२४

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मे. सिडकोने त्यांच्याकडील १२.५ टक्के योजनेअंतर्गत मुळ भुखंडधारक १) श्री. पंढरीनाथ नारायण कडू, २) श्री. कृष्णा नारायण कडू, ३) श्रीमती. गंगाबाई नामदेव भगत, ४) श्री. चिंतामण नामदेव भगत, सज्ञान, ५) श्री. अशोक नामदेव भगत, ६) श्री. योगेश नामदेव भगत, ७) श्री. परेश नामदेव भगत, ८) श्री. तुकाराम बाळाराम भगत, ९) श्री. बाळकृष्ण बाळाराम भगत, १०) श्री. भास्कर दत्तू घरत, ११) श्री. शंकर दत्तू घरत, १२) श्री. मधूकर दत्तु घरत, १३) श्री. चंद्रकांत तुकाराम म्हात्रे, १४) श्री. दत्ता तुकाराम म्हात्रे, १७) श्री. अभिमन्यू तुकाराम म्हात्रे, १६) श्रीमती. सविता कृष्णा म्हात्रे, १७) श्री. करण कृष्णा म्हात्रे १८) श्रीमती. रविना कैलास घरत, १९) श्रीमती. भिमा राजाराम म्हात्रे, २०) श्री. रणधीर राजाराम म्हात्रे, २१) श्री. मयुर राजाराम म्हात्रे, २२) श्री. लक्ष्मी निलेश पाटील, यांच्याकडून त्यांच्या लाभांत मौजे उलवे नोंड, ता. पनवेल, जि. रायगड येथे सिडको संचिका क. उलवे ८६९ अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या भुखंडाचे मे. सिडकोची पूर्व परवानगी घेऊन हस्तांतरित करुन घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे-

**भुखंडाचे वर्णन**

| नोड, ता. आणि जि. | भुखंड क्र. | सेक्टर | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| उलवे नोड, ता. पनवेल, जि. रायगड | ए ५७ | १६ | ८५० चौ. मी. |

तरी या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, वर उल्लेखित भुखंडाचे आमच्या अशिलांच्या लाभांत हस्तांतरण करुन घेण्याकरिता मे. सिडकोमार्फत संबंधित हस्तांतरण परवानगी मिळाल्यानंतर सदरहु भुखंडासंदर्भात आमचे अशिलांनी त्रिपक्षीय करारनामा करण्याचे ठरविले आहे, सदर भुखंडाचे हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, जर वरील नमुद केलेल्या भुखंडावर अन्यथा कोणाचा कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध, दावा असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी पुराव्यानिशी कळवावे. जर वरील मुदतीत कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर आमचे अशील सदरहु भुखंडासंदर्भातील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**सही /-**
**धनंदा प्रदिप मोकल**
(वकील उच्च न्यायालय)
पत्ताः शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे फोन नं. ९६१९५०५९५८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे उसर्ली खुर्द, ता. पनवेल, जि. रायगड येथील **मेधा अजित कट्टी व इतर** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी मालकी हक्काचे पडताळणी करून खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**परीशिष्ट**
**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे उसर्ली खुर्द, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मेधा अजित कट्टी<br>अनघा जोकीम फर्नांडीस<br>आश्लेषा सौरभ ओक | ७८ | ३ | ०-४०-४७ | ३.५० |

सबब वर नमुद परीशिष्ट शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क, हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अॅटचमेंट, लीज एम.ओ.यु.वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **२१ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : ३१/१२/२०२४

**सही/-**
**अॅड. विजय भंगत अॅन्ड असोशिएटस्**
(अॅडव्होकेट अॅन्ड लिगल कन्सलटंट)
शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email.vijaybhagat43@gmail.com

(पान ५ वरून)

| | | | |
|---|---|---|---|
| २१. | कळंबोली पोस्ट ऑफिस जवळ, कळंबोली | ०१ | ०९ |
| २२. | पनवेल मुंब्रा रोड हायवे कळंबोली बस स्टॉप जवळ | ०१ | १० |
| २३. | सेक्टर- २०, रोडपाली मैदान बाजूला | ०१ | ०७ |
| २४. | श्रीजी मिठाईवाला चौक, सेक्टर- २०, कळंबोली | ०१ | ०७ |
| २५. | के.एल.ई. कॉलेज बस स्टॉप समोर, कळंबोली | ०१ | ०८ |
| २६. | हनुमान मंदिर एल आय जी सेक्टर- २ ई, कळंबोली | ०१ | ०८ |
| २७. | सेक्टर- १२, रोडपाली म्हसोबा तलावाजवळ | ०१ | ०७ |
| २८. | आसुडगाव बस डेपो जवळ | ०१ | ०९ |
| २९. | जुना मुंबई पुणा हायवे शंकर मंदीर जवळ, खांदा कॉलनी | ०१ | १५ |
| ३० | शिवाजी चौक सर्कलच्या बाजुस खांदा कॉलनी | ०१ | १५ |
| ३१. | महाराष्ट्र शाखा जवळ रोडपाली | ०१ | ०८ |
| ३२. | रोडपाली बस डेपो समोर, कळंबोली | ०१ | ०७ |
| ३३. | महत्मा स्कुल रोड, डाव्या बाजुस, सेक्टर- ८, खांदा कॉलनी | ०१ | १५ |
| ३४. | सी.के.टी कॉलेज रोड, उजव्या बाजुस, खांदा कॉलनी | ०१ | १५ |
| ३५. | हनुमान मंदीर समोर, आसुडगाव | ०१ | १५ |
| ३६. | नॅशनल बॅंके समोर, नवीन पनवेल | ०१ | १५ |
| ३७. | सेक्टर- ०७, पॅनेसिया हॉस्पिटल समोर, नविन पनवेल | ०१ | ०९ |
| ३८. | आदई तलावा जवळ, नवीन पनवेल | ०१ | ०९ |
| ३९. | आदई सर्कल समोर, डाव्या बाजुस, नविन पनवेल | ०१ | १६ |
| ४०. | शिवा कॉम्प्लेक्स, रस्त्याचे डाव्या बाजुस, नवीन पनवेल | ०१ | १६ |
| ४१. | एच.डी.एफ.सी. सर्कल समोर उजव्या बाजुस, नवीन पनवेल | ०१ | १६ |
| ४२. | डी मार्ट दोन्ही बाजुस, नवीन पनवेल | ०१ | १६ |
| ४३. | नेवाळी ब्रिज जवळ, नवीन पनवेल | ०१ | ०९ |
| ४४. | डॉ. वाजेकर यांचे दवाखान्याचे बाजुस, सेक्टर- ४, नवीन पनवेल | ०१ | १६ |
| ४५. | शबरी हॉटेल समोर, सेक्टर- ०१, नवीन पनवेल | ०१ | १६ |
| ४६. | सेक्टर- ०१, अपना सहकारी बॅंक जवळ, मनसे गार्डन , नवीन पनवेल | ०१ | १६ |
| ४७. | नवीन पनवेल पेट्रोल पंपासमोर, सेक्टर- ११ | ०१ | १६ |
| ४८. | महादेव पाटील यांचे सर्विस सेंटर जवळ चौक, कळंबोली | ०१ | ०७ |
| ४९. | सिडको अग्निशमन केंद्राजवळ, कळंबोली | ०१ | १० |
| ५०. | देशी तडका हॉटेल जवळ, आसुडगाव | ०१ | ०९ |
| ५१. | इंटरनेटबार समोर, आसुडगाव | ०१ | ०९ |
| ५२. | देवांशी इन हॉटेल समोर, स्टील मार्केट, उजव्या बाजुस, कळंबोली | ०१ | ०९ |
| ५३. | मॅकडोनाल्डच्या डाव्या बाजुस, कळंबोली | ०१ | १० |
| ५४. | डी. ए. व्हि. स्कुल समोर, उजव्या बाजुस, नवीन पनवेल | ०१ | १६ |
| | **प्रभाग समिती 'क' कामोठे :-** | | |
| १ | कामोठे प्रवेश अरीवली स्वीट से. ०६ ए, रिक्षा स्टॅंड जवळ | ०१ | ११ |
| २ | शिवसेना शाखेजवळ से. ३६, कामोठे. | ०१ | ११ |
| ३ | एज जी शोरूम खांदा कॉलनी, से. ०७ | ०१ | ११ |
| ४ | कामोठे पोलीस स्टेशन जवळ, से. ११, कामोठे. | ०१ | ११ |
| ५ | ऐश्वर्या हॉटेल समोर से. ०९ कामोठे | ०१ | ११ |
| ६ | मनमोहन स्वीट समोर, से. ३४, कामोठे. | ०१ | ११ |
| ७ | मालवन हॉटले जवळ, से. ३४, कामोठे | ०१ | ११ |
| ८ | से. १७ समोरील मैदान समोर, मानसरोवर स्टेशन रोड, डाव्या बाजुस, कामोठे | ०१ | ११ |
| ९ | से. २१ सिडको कार्यालय, सिडको कम्यूनीटी सेंटर जवळ कामोठे. | ०१ | ११ |
| १० | से. ०९ सिडको ऑफिसच्या बाजूला सिडको कम्यूनीटी सेंटर कामोठे | ०१ | १२ |
| ११ | से. २१, भाजी मार्केट, कामोठे. | ०१ | १२ |
| १२ | से. २२ सिडको मार्केट जवळ, कामोठे | ०१ | १२ |
| १३ | से. २५ अक्षर सोसायटी जवळ, कामोठे | ०१ | १३ |
| १४ | से. २० सिडको गार्डन जवळ ( कामोठे स्मशानभुमी जवळ) | ०१ | १३ |
| १५ | से. ०५ दत्तूशेठ पाटील कॉलेज जवळ. कामोठे | ०१ | १३ |
| १६ | सेक्टर- १७ समोरील मैदान, मानसरोवर स्टेशन रोड, उजव्या बाजुस, कामोठे | ०१ | १३ |
| | **प्रभाग समिती 'ड' पनवेल** | | |
| १. | काळुंद्रे पेट्रोलपंप डाव्या बाजुस, पनवेल | ०१ | १९ |
| २. | काळुंद्रे पेट्रोलपंप उजव्या बाजुस, पनवेल | ०१ | १९ |
| ३. | काळुंद्रे गाव प्रवेशमार्ग, डाव्या बाजुस, पनवेल | ०१ | १९ |
| ४. | काळुंद्रे गाव प्रवेश मार्ग, उजव्या बाजुस, पनवेल | ०१ | १९ |
| ५. | पंचरत्न हॉटेल समोर, पनवेल | ०१ | १९ |
| ६. | पिल्ले हॉस्टेल, समोर, उजव्या बाजुला, नवीन पनवेल | ०१ | १९ |
| ७. | पिल्ले हॉस्टेल, समोर, डाव्या बाजुला, नवीन पनवेल | ०१ | १९ |

जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२४/प्र.क्र. ६२६/६२७/२०२४
दिनांक :- ३१/१२/२०२४

# आयुष म्हात्रेचा विश्वविक्रम!

## यशस्वी जैस्वालला मागे टाकत रचला इतिहास



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

मुंबई संघाचा १७ वर्षीय खेळाडू आयुष म्हात्रे हा विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत धुमाकूळ घातला आहे. त्याने नागालँडविरुद्ध ऐतिहासिक शतक झळकावत यशस्वी जैस्वालचा विक्रम मोडला.

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर मुंबईविरुद्धच्या सामन्यात नागालँड संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी निवडली. प्रथम फलंदाजी करणाऱ्या मुंबई संघाच्या डावाची सुरुवात आयुष म्हात्रे आणि अंगक्रिश रघुवंशी यांनी केली. या दोघांनी मुंबई संघाला दमदार सुरुवात करून दिली आणि दोघांमध्ये पहिल्या विकेटसाठी १५६ धावांची भागीदारी झाली. अंगक्रिश बाद झाला, पण आयुषने आक्रमक फलंदाजी सुरूच ठेवली.

आयुष म्हात्रेने ११७ चेंडूंचा सामना करताना १८१ धावा केल्या. १७ वर्षीय आयुषने लिस्ट-ए क्रिकेटमधील पहिले शतक झळकावले. त्याचे दुहेरी शतक अवघ्या १९ धावांनी हुकले. या कालावधीत त्याचा स्ट्राईक रेट १५४पेक्षा जास्त होता आणि त्याच्या खेळीत एकूण ११ षटकार आणि १५ चौकारांचा समावेश होता.

आयुष म्हात्रे वयाच्या अवघ्या १७ वर्षे आणि १६८ दिवसांत लिस्ट ए क्रिकेटमध्ये १५०हून अधिक धावा करणारा जगातील सर्वात तरुण खेळाडू ठरला. त्याने यशस्वी जैस्वालचा यापूर्वीचा विक्रम मोडला. यशस्वीने २०१९मध्ये झारखंडविरुद्ध हा पराक्रम केला होता. तेव्हा त्याचे वय १७ वर्षे आणि २९१ दिवस होते.

आयुषशिवाय आंगक्रिशने ५६ धावांची खेळी खेळली. त्याचवेळी कर्णधार शार्दुल ठाकूरने ७३ धावांची नाबाद खेळी केली. अशा प्रकारे मुंबई संघाने ५० षटकांत सात गडी गमावून ४०३ धावा केल्या. लिस्ट-ए क्रिकेटमध्ये मुंबई संघाची ही दुसरी सर्वोच्च धावसंख्या ठरली.

### कुमार-कुमारी गट निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# रायगड, सांगली, पुणे, ठाणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, परभणी संघांची विजयी सलामी



**सांगली : प्रतिनिधी**

यजमान सांगली, रायगड, पुणे ग्रामीण, ठाणे ग्रामीण, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, परभणी यांनी ५१व्या कुमार-कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या कुमार गटात विजयी सलामी दिली. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने सांगली जिल्हा कबड्डी असोसिएशनने युवक मराठा मंडळाच्या सहकार्याने ही स्पर्धा आयोजित केली आहे.

सांगलीच्या सांगलीवाडी येथील चिंचबाग मैदानावर राज्य संघटनेचे उपाध्यक्ष माजी आमदार दिनकर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धा खेळली जात आहे. मुलांच्या उद्घाटनीय सामन्यात सांगलीने ह गटात नाशिक शहराचा प्रतिकार ४८-३३ असा मोडून काढला. दोन लोण देत मध्यांतराला सांगलीने २८-१४ अशी आघाडी घेतली. नंतर मात्र नाशिककरांनी त्यांना बरोबरीची लढत दिली. आदित्य येसुगडे, व्यंकटेश वडार, प्रतीक जाधव यांचा चतुरस्त्र खेळ व स्थानिक रसिकांचा मिळालेला पाठिंबा यामुळे हे शक्य झाले. स्वयम् मालोदे, रेहान शेख यांनी उत्कृष्ट खेळ केला.

रायगडने फ गटात बीडवर ४६-३२ अशी मात केली. दोन्ही डावात एक-एक लोण देत आघाडी आपल्याकडेच कशी राहील याची दक्षता घेतली. राज मोरे, नीरज मिसाळ यांच्या अष्टपैलू खेळाला या विजयाचे श्रेय जाते. बीडच्या शुभम गर्जे, रोहित राठोड, कृष्णा उबाळे यांनी चांगली लढत दिली. पिंपरी-चिंचवडने ब गटात सातारा संघाला ६६-१८ असे लोळवित बाद फेरीतील आपला प्रवेश निश्चित केला. झंझावाती सुरुवात करीत चार लोण देत ४८-११ अशी मोठी आघाडी घेत सातारची हवा काढून घेतली. श्रीधर कदम, कृष्णा चौहान यांच्या भन्नाट खेळाला याचे श्रेय जाते.

पिंपरी-चिंचवडने चुरशीच्या लढतीत अहिल्यानगरला ३४-३१ असे रोखले. विश्रांतीला १३-१७ अशा पिछाडीवर असलेल्या पिंपरी-चिंचवडने विश्रांतीनंतर जोरदार लढत देत ही किमया साधली.

पुणे ग्रामीणने क गटात लातूरला ३१-१७ असे नमविले. प्रणव बांगर, साहिल माने, देव शिर्के यांच्या दर्जेदार खेळाने पुणेकरांनी हा विजय साकारला. नंदुरबारने ड गटात पहिल्या डावातील १७-१९ अशा पिछाडीवरून नांदेडला ४१-३१ असे रोखले.

अहिल्यानगरने ब गटात औरंगाबादला ४३-१७ असे नमवित पहिल्या साखळी विजयाची नोंद केली. युवराज गवारे, विशाल ब्राम्हणी यांच्या चढाई पकडीच्या खेळाने हा विजय साकारला. पुणे ग्रामीणने क गटात अर्जुन धडास, साहिल माने यांच्या चतुरस्त्र खेळाच्या जोरावर जळगाव संघाचा ५९-२१ असा पराभव केला. ठाणे शहरने नंदुरबारवर ३८-२२ असा विजय मिळविला. मुंबई उपनगर पश्चिमने अ गटात मुंबई शहर पश्चिमचा ५२-४६ असा पराभव केला. या दुसऱ्या पराभवाने मुंबई शहरचे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.

# रोहा तालुका क्रीडा स्पर्धेला सुरुवात



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या क्रीडा स्पर्धेला भुनवेश्वर येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात सुरुवात झाली आहे.

या वेळी गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, माजी उपसरपंच शांतीशील तांबे, जिल्हा क्रीडा समन्वयक अजय कापसे, पत्रकार महादेव सरसंबे यांच्यासह तालुका क्रीडा समन्वयक संतोष यादव, केंद्र प्रमुख नारायण गायकर, विवेकानंद पोटे, विजय वेळे, प्रदीपकुमार खाडे, किशोर जाधव, ब्रिजेश भादेकर, विनायक शिंदे, शशीकांत शेळके, संतोष जाधव, कल्पना पवार, शिक्षक विजय धोत्रे, अरुण आगळे, ज्ञानेश्वर मुंगळे, निवास थळे, भुवनेश्वर येथील पाडगे, शिक्षिका लीना सुर्वे, सुचिता जंगम, सुचिता वाघमारे, सीमा गर्जे, कल्याणी शिंदे आदी उपस्थित होते.

गटशिक्षणाधिकारी धायगुडे यांनी क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. अजय कापसे म्हणाले की, या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे तळागळातील विद्यार्थी सहभागी होतात.

स्पर्धेच्या सुरुवातीला खेळाडूंना शपथ देण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करून व श्रीफळ वाढवून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. या क्रीडा स्पर्धेत रोहा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील १८ केंद्रातून ४००च्या आसपास विद्यार्थी सहभागी झाले.

# अभिषेक शर्माचे वादळी शतक

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**



पंजाब आणि सौराष्ट्र यांच्यातील विजय हजारे करंडक फेरीच्या पाचव्या सामन्यात अभिषेक शर्माने वादळी दीडशतक झळकावून सर्वांना चकित केले आहे. त्याच्या आणि प्रभसिमरन सिंगच्या दमदार शतकांच्या जोरावर पंजाबने पाच गड्यांच्या मोबदल्यात ४२४ धावा केल्या.

अहमदाबादच्या गुजरात कॉलेज मैदानावर नाणेफेक हारून प्रथम फलंदाजी स्वीकारल्यानंतर पंजाब संघाने ३१ षटकांत २९८ धावा केल्या. संघासाठी कर्णधार अभिषेक शर्माने स्फोटक फलंदाजी केली आणि दुसऱ्या बाजून प्रभसिमरन सिंगनेही शानदार साथ दिली. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी २९८ धावा केल्या. विजय हजारे ट्रॉफीतील पहिल्या विकेटसाठीची ही सर्वोच्च भागीदारी आहे.

यादरम्यान टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या अभिषेक शर्माने तुफान फटकेबाजी केली. त्याने ९६ चेंडूत २२ चौकार आणि आठ षटकार ठोकले, तर प्रभसिमरन सिंगने ९५ चेंडूंचा सामना करताना ११ चौकार आणि आठ षटकार मारले. त्याने १२५ धावा केल्या.

एकीकडे भारतीय संघ ऑस्ट्रेलियात संघर्ष करीत आहे आणि बीसीसीआय रोहित शर्मा आणि विराट कोहलीसारख्या फलंदाजांच्या बदलीच्या शोधात आहे, तर दुसरीकडे काही तरुणांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये स्वत:ला सिद्ध केले आहे. त्यापैकीच एक म्हणजे अभिषेक शर्मा, जो सध्या तुफान फॉर्ममध्ये दिसून येत आहे.

# बुमराहला दोन मोठ्या पुरस्कारांसाठी नामांकन




**दुबई : वृत्तसंस्था**

सध्याच्या घडीला जागतिक क्रिकेटमधील आघाडीचा वेगवान गोलंदाज म्हणून जसप्रीत बुमराहने आपली ओळख निर्माण केली आहे. सध्या सुरू असलेल्या भारताच्या ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या कसोटी मालिकेतही बुमराहने एकट्याने ३१ विकेट घेतले आहेत. याचबरोबर आता बुमराहच्या कामगिरीची दखल आयसीसीने घेतली असून त्याला दोन पुरस्कारांसाठी नामांकन मिळाले आहे.

जसप्रीत बुमराहला प्रथम वर्षातील सर्वोत्कृष्ट कसोटी खेळाडू या पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आणि आता यानंतर बुमराहला वर्षातील सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू या पुरस्कारासाठी नामांकित करण्यात आले आहे. बुमराहने २०२४मध्ये तिन्ही फॉरमॅटमध्ये भारतासाठी चमकदार कामगिरी केली आहे. म्हणूनच त्याला वर्षातील सर्वोत्कृष्ट पुरुष क्रिकेटपटूसाठी सर गारफिल्ड सोबर्स ट्रॉफीसाठी निवडण्यात आले आहे. त्याच्यासह इंग्लंडचा हॅरी ब्रूक, ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड व इंग्लंडचा जो रूट यांनाही नामांकन मिळाले आहे.

# गावसकरांनी निवड समितीला दिला महत्त्वाचा सल्ला

**नवी दिल्ली** : मेलबर्न येथील बॉक्सिंग डे कसोटी सामन्यात भारताला ऑस्ट्रेलियाविरुद्ध १८४ धावांनी दारुण पराभव पत्करावा लागला. यानंतर भारतीय संघातील वरिष्ठ खेळाडूंवर सातत्याने टीका होत आहे. भारतीय कर्णधार रोहितसाठी निवृत्तीचा मुद्दा आधीच चर्चेचा विषय असताना, ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर विराट आपली एकमेव चूक सुधारण्यात अपयशी ठरल्यामुळे त्याच्यावरही टीका होत आहे. अशात भारताचे महान खेळाडू सुनील गावस्कर यांनी निवडकर्त्यांना कोहली आणि रोहितसारख्या भारतीय संघातील वरिष्ठ खेळाडूंच्या भवितव्याचा विचार करण्याचा सल्ला दिला आहे.











